# गोदावरी तीरीच्या अगस्त्य लीला

(ब्रह्मदेव निरुपित गौतमी माहात्म्यांतर्गत नारदश्रुत अगस्त्यकथा
ब्रह्मपुराणातील मूळ गौतमी माहात्म्यातील अध्याय संहितेसह)

डॉ. अनिल सहस्रबुद्धे

प्रकाशक
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत
प्रकाशन मंच

**गोदावरी तीरीच्या अगस्त्य लीला (पुराण कथा)**
Godavari Tirichya Agastya Leela (Puran Katha)

**लेखक**
**डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक** : आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष- ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

**प्रथम प्रकाशन (आवृत्ती)** : २०२४

**टाईपसेटींग** :
श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक** : कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर

**सेवा मूल्य** १००/-

विशेष निवेदन : 'आनंदोत्सव'प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.

ग्रंथनिर्मितीचा संपूर्ण खर्च सौ. उषा सहस्रबुद्धे यांनी केला असून, त्यातून मिळणारे उत्पन्न सेवाभावी ट्रस्टना देण्याचा संकल्प केला आहे.

या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.



**महर्षी अगस्त्यमहामुनी भक्तांस**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| (१) | अगस्त्य माहात्म्य | ५ |
| (२) | महर्षी अगस्तीमुनी कृपेने हनुमान आणि पिशाचराज अद्री यांचे अवतरण | ८ |
| (३) | महर्षी अगस्तीमुनींच्या सहयोगाने इंद्र पापमुक्त | १२ |
| (४) | महर्षी अगस्त्यांच्या मार्गदर्शनाने विंध्य, अश्वत्थ व पिप्पल गर्वहरण तथा अश्वत्थादि सहस्त्रतीर्थ निर्मिती | १७ |
| (५) | गौतमी गंगा आणि महर्षी अगस्त्यमुनी कृपेने एकोणपन्नास मरुतांचे कल्याण | २३ |
| (६) | महर्षी आपस्तंब आश्रमात महर्षी अगस्त्यांचे शंकानिरसनात्मक तत्त्व प्रतिपादन | ३९ |
| (७) | गोदावरी तीरी महर्षी अगस्तीमुनींनी ब्रह्ममानसपुत्रांसाठी केले ज्ञान तथा अद्वय चिंतन | ४५ |
| (८) | सागराकडून महर्षी अगस्त्यांचा गौरव अर्थात गंगासागर संगम कथा | ५३ |




## (१)
# अगस्त्य माहात्म्य

महर्षी अगस्ती महामुनी यांचा विश्वातील केंद्रीय आश्रम अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील अकोले तालुक्यात प्रवरा अमृतवाहिनी नदीच्या उत्तर तीरावर महर्षींनी स्थापित केलेला आहे. समुद्रमंथन प्रसंगातील अमृत प्राकट्य कथा तसेच अमृत वितरण कथा या प्रसंगांपासूनचा इतिहास हा केंद्रवर्ती आश्रम प्रसिद्ध करतो. अमृतवाहिनी प्रवरातीरी त्रेतायुगात प्रभु रामचंद्रांच्या कथांनी व संचाराने या आश्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. वाल्मिकींचा आश्रम (तातोबा मठ) याच अमृतवाहिनी तीरावर स्थित आहे. वाल्मिकी रामायणाचा आविष्कार अमृतवाहिनी तीरी घडला असा इतिहास आहे. महर्षी अगस्ती महामुनी यांच्या या केंद्रीय आश्रमात गुरु वसिष्ठांच्या आज्ञेनुसार प्रभु रामचंद्र महर्षी अगस्ती महामुनी यांचेकडून मार्गदर्शन प्राप्त करण्यासाठी आले. महर्षींनी त्यांना नाशिक येथील गोदावरीच्या उत्तर तीरावर पंचवटी स्थानी कुटी बांधून वनवास व्यतित करण्याची आज्ञा केली. सीताहरण प्रसंगानंतर महर्षी अगस्त्यांनी, दिव्य खड्ग, अक्षयबाण भाता व अन्य शस्त्रे अस्त्रे प्रदान केली. आदित्यहृदय स्तोत्राची संथा देऊन प्रखर सौरशक्ती सूर्यवंशी रामांच्या बाणामध्ये प्रकट होईल व रामबाण सिद्ध होईल, अशी कृपा घडविली.

प्रवरा तीरी अमृतेश्वर स्थापित करून प्रखर तेजस्वी अमृतवाहिनी प्रवरा महर्षी अगस्त्यांनी नारदांच्या साक्षीने, भगवान विष्णूंच्या पदकमलाद्वारे शिवाज्ञेने व कृपेने सिद्ध केली. ही प्रवरा अमृतवाहिनी जनजीवनार्थ अमृत

घेऊन प्रवरासंगम येथे गोदावरीस मिळते व अमृतवाहिनी गोदावरी होते. गोदावरीची महत्त्वाची उपनदी म्हणून अमृतवाहिनी प्रवरा प्रवाहित असल्यामुळे तिला गोदावरी हे नावही प्राप्त झाले. त्यामुळे गोदावरी नदीच्या दक्षिण तीरावर महर्षी अगस्ती मुनींचा आश्रम आहे, असे पुराणात उल्लेखिले जाते.

महर्षी अगस्त्य माहात्म्य हा अगस्त्य चरित्र गाणारा व अगस्त्यांचे कर्तृत्व व भगवद्शक्तीयुक्त व्यक्तिमत्त्व प्रसिद्ध करणारा ग्रंथ आहे. महर्षी अगस्त्यमुनी यांनी साक्षात्कारपूर्वक हा ग्रंथ लिहून प्रसिद्ध करण्याची आज्ञा लेखक महर्षी अगस्त्य आज्ञांकित - अनिल नागेश सहस्रबुद्धे यांच्याकडून लिहवून प्रसिद्ध करविला. अगस्त्य माहात्म्यामध्ये महर्षी अगस्त्यांचे, अतिप्राचीन, वैदिक द्रष्टा ऋषीपण वर्णिले आहे. पर्जन्य व्यवस्थापक, ऋतुचक्र निर्माता, कृषीविज्ञान प्रकटविणारा, पशुपक्षी व लोकव्यवस्थापक, जलव्यवस्थापक, स्थापत्य, संगीत, भविष्य व वैद्यकशास्त्र, योगशास्त्र उद्घाटक, महान तत्त्वज्ञ, दिग्व्यवस्थापक, युद्धशास्त्र उद्गाता असे उत्तुंग विभूतिमत्त्व वर्णिले आहे. महर्षी लोपामुद्रा यांचे या सर्व गुणवैशिष्ट्यांसह अनुगामिनी स्वरूपाचे विभूतिमत्त्व प्रसिद्ध झाले आहे. ज्ञानविज्ञान आणि संपूर्ण विश्वप्राकट्य लीला यातील महर्षींचे कार्य ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्या सर्वशक्तिनिशी यौगिक सामर्थ्य प्राकट्यामध्ये केंद्रस्थानी आहे असे जाणवते. त्यांच्या अशा कर्तृत्वामुळे ब्रह्ममानसपुत्रातील क्रतु, पुलह आणि पौलस्त्य या सप्तऋषींतील ऋषींचे समावेशन महर्षी अगस्त्यांमध्ये होऊन त्यांना सप्तर्षींत सर्वमान्य असे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

महर्षी अगस्त्य महामुनी या केंद्रीय आश्रमातून आजही विश्वसंचार करीत ठिकठिकाणच्या आश्रमस्थानावरून विविध प्रकारचे कार्य विविध आज्ञांकितांच्या माध्यमातून, गुरुकुलपरंपरेने उपरोक्त सर्व क्षेत्रात कार्य करवून घेत आहेत. महर्षी अगस्त्य अनेकदा साक्षीभूत होऊन मार्गदर्शन करतात. लोककल्याणकारी भगवद्कार्य किंवा शिवकार्य असे त्यांच्या कार्याचे स्वरूप अनुभूत होते. प्रापंचिकांना, राजकीय धुरिणांना, समाजधुरिणांना न्याय्य व समावेशक लोककल्याणकारी कार्य करण्यासाठी महर्षी सदैव मार्गदर्शकपणाने सहाय्यभूत होतात. भवसागर तरुन जाण्यासाठी सद्गुरु कृपावंत म्हणून ते लोकदेव या स्वरूपात भक्तांना नित्य अनुभूत होतात.



गोदावरी माहात्म्यामध्ये महर्षी अगस्त्यांच्या दिव्य कार्याविषयीच्या कथा प्रत्यक्ष ब्रह्मदेवांच्या मुखाने ब्रह्मर्षी, ब्रह्मपुत्र नारदमुनींना त्या सांगितल्या आहेत. ब्रह्मपुराणातील गौतमी माहात्म्याच्या लेखनातून त्या दिव्य कथा ऐकण्याचा लाभ आपणासही सहजगत्या होतो व अगस्त्य माहात्म्याची साक्ष पटते. 'अगस्त्य माहात्म्य', 'श्री लोपामुद्रा चरित्र', 'अगस्त्य अभंगावली', 'अगस्त्य' कादंबरी, 'अगस्त्य नित्यपाठाचे अभंग', अगस्त्य व लोपामुद्रा यांच्या आरत्या या अनिल सहस्रबुद्धे लिखित ग्रंथसंपदेतून तसेच 'स्तोत्रमंजुषा', 'मैत्रावरुणि अगस्त्य विरचित सूक्ते' या सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे यांनी सार्थ संपादित केलेल्या ग्रंथांतून अगस्त्यांचे देव, ऋषी, सिद्ध, महामुनी, शिव-विष्णू भक्त असे महान विभूतिमत्त्व प्रकट झाले आहे.

* * *

# (२)

# महर्षी अगस्तीमुनी कृपेने हनुमान आणि पिशाचराज अद्री यांचे अवतरण

ब्रह्मदेवांनी गौतमी गंगेच्या तीरावरील शिवस्वरूप वायुसुत केसरीपुत्र, अंजनीसुत हनुमान आणि अद्रिकापुत्र निर्ऋतीसुत पिशाचराज अद्री यांच्या जन्माची अद्‌भुत कथा गौतमी माहात्म्य कथन करताना चौदाव्या अध्यायात सांगितली आहे – या दोन्ही दिव्य पुत्रांचा जन्म महर्षी अगस्ती मुनींच्या कृपेने झाला.

ब्रह्मदेव नारदांना म्हणाले, ''ब्रह्मगिरीच्या बाजूला एक पवित्र अंजन नावाचा पर्वत आहे. स्वर्गातील शापभ्रष्ट झालेल्या दोन अप्सरा या पर्वतावर रहात होत्या. त्यांची नावे – अंजना आणि अद्रिका अशी होती. शापामुळे पुंजिस्थला अप्सरा अंजना नावाने वानरीचा चेहरा असलेल्या अवस्थेत आणि अद्रिका अप्सरा मांजरीचा चेहरा असलेल्या अवस्थेत या पर्वतावर रहात होत्या. शापवाणीप्रमाणे योगायोगाने त्यांचा विवाह वानरराज केसरी यांच्याशी झाला होता. राजधर्माप्रमाणे केसरीराजा दक्षिण समुद्रावर मोहिमेसाठी गेला होता. या अवधीत महर्षी अगस्त्यमुनी अंजन पर्वतावर तपस्येसाठी आले. अंजना आणि अद्रिका या दोघींनीही महर्षी अगस्त्यांची योग्य प्रकारे, तपश्चर्या निर्विघ्न होईल अशी सेवा केली.''

पुढे ब्रह्मदेव सांगू लागले, ''महर्षी अगस्त्य प्रसन्न झाले. त्यांनी वर मागावयास सांगितला. तेव्हा दोघींनीही सर्व लोक उपकारक बलवान व श्रेष्ठ अशा पुत्राचे वरदान मागितले. महर्षींनी 'तथास्तु' म्हणून वरदान मान्य केले व तेही दक्षिणेकडे निघून गेले. उत्तम पुत्रांची प्राप्ती होणार या आनंदात पर्वतावर विहार करीत असताना, एकदा त्यांच्या अप्सरा वृत्तीप्रमाणे, त्या नृत्यगायनात रंगून गेल्या. तेथे वायू आणि निर्ऋती या दोन देवतांचा संचार झाला. ते अप्सरांच्या नृत्यगायनाला भुलले. त्यांना कामवासनेने पछाडले. ते तात्काळ त्या दोन्ही अप्सरांना म्हणाले, 'आम्ही इच्छित वर देणारे देव आहोत. तुम्ही आमच्याशी पत्नीवत रममाण झालात तर तुमच्या इच्छा पूर्ण होतील.' अप्सरावृत्तीच्या अंजनादेवी आणि अद्रीदेवी यांनी देवांशी रत होण्यात गैर नाही, असा विचार करून अंजनादेवी वायुदेवतेशी व अद्रिका निर्ऋती देवतेशी रत झाल्या. महर्षी अगस्त्यांच्या वरदानाप्रमाणे अंजनादेवी आणि वायुदेव यांना हनुमान नावाचा पुत्र व अद्रिका आणि निर्ऋती यांना अद्री नावाचा पुत्र झाला.''

ब्रह्मदेव पुढे म्हणाले, ''अंजना आणि अद्रिनी वायू आणि निर्ऋतीला, इंद्रशापामुळे चेहरा विद्रुप झाल्याचे सांगितले. महर्षी अगस्त्यांच्या कृपेमुळे उत्तम पुत्र प्राप्त झाले हे ठीकच; परंतु आपण उभयदेवांनी, आमची कुरुप रुपे शापमुक्तीने कशी पूर्ववत होतील असा उपचार करावा. तेव्हा वायू आणि निर्ऋती यांनी त्यांना गौतमी नदीत स्नान केल्याने शापमुक्त होऊन, तुम्ही दोघीही पूर्ववत व्हाल असे वरदान दिले. त्यांचे संभाषण ऐकून दिव्य पुत्र हनुमान आणि अद्री यांनी आपल्या मातांना गौतमी गंगेवर नेले व त्यांना दिव्य स्नान घडविले. ही घटना जेथे घडली त्या गौतमी तीर्थाला अंजना तीर्थ, पैशाच तीर्थ, हनुमत् तीर्थ व अद्री तीर्थ किंवा मार्जार तीर्थ अशी नावे मिळाली. हे तीर्थ शापमुक्त करणारे व सर्व इच्छा पुरविणारे तीर्थ आहे. हनुमान केसरीनंदन, रामभक्त म्हणून प्रसिद्ध झाले तर अद्री, केसरीनंदन, पिशाचराज म्हणून प्रसिद्ध झाले.

अशा रीतीने ब्रह्मपुराणातल्या गौतमी माहात्म्यातला पैशाचतीर्थवर्णनम् नावाचा चौदावा अध्याय संपला.

* * *

# अथ चतुर्दशोऽध्यायः ।

ब्रह्मोवाच ।
पैशाचं तीर्थमपरं पूजितं ब्रह्मवादिभिः ।
तस्य स्वरूपं वक्ष्यामि गौतम्या दक्षिणे तटे ।।१।।
गिरिर्ब्रह्मगिरेः पार्श्वे अञ्जनो नाम नारद ।
तस्मिञ्शैले मुनिवर शापभ्रष्टा वराप्सरा ।।२।।
अञ्जना नाम तत्रासीदुत्तमाङ्गेन वानरी ।
केसरी नाम तद्भर्ता अद्रिकेति तथापरा ।।३।।
सापि केसरिणो भार्या शापभ्रष्टा वराप्सरा ।
उत्तमाङ्गेन मार्जारी साप्यास्तेऽञ्जनपर्वते ।।४।।
दक्षिणार्णवमभ्यागात् केसरी लोकविश्रुतः ।
एतस्मिन्नन्तरेऽगस्त्योऽञ्जनं पर्वतमभ्यगात् ।।५।।
अञ्जना चाद्रिका चैव अगस्त्यमृषिसत्तमम् ।
पूजयामासतुरुभे यथान्यायं यथासुखम् ।।६।।
ततः प्रसन्नो भगवानाहोभे व्रियतां वरः ।
ते आहतुरुभेऽगस्त्यं पुत्रौ देहि मुनीश्वर ।।७।।
सर्वेभ्यो बलिनौ श्रेष्ठौ सर्वलोकोपकारकौ ।
तथेत्युक्त्वा मुनिश्रेष्ठो जगामाशां स दक्षिणाम् ।।८।।
ततः कदाचित् ते काले अञ्जना चाद्रिका तथा ।
गीतं नृत्यं च हास्यं च कुर्वत्यौ गिरिमूर्धनि ।।९।
वायुश्च निर्ऋतिश्चापि ते दृष्ट्वा सस्मितौ सुरौ ।
कामाक्रान्तधियौ चोभौ तदा सत्वरमीयतुः ।।१०।।
भार्ये भवेतामुभयोरावां देवौ वरप्रदौ ।
ते अप्यूचतुरस्त्वेतद्रेमाते गिरिमूर्धनि ।।११।।
अञ्जनायां तथा वायोर्हनुमान् समजायत ।
अद्रिकायां च निर्ऋतेरद्रिर्नाम पिशाचराट् ।।१२।।
पुनस्ते आहतुरुभे पुत्रौ जातौ मुनेर्वरात् ।
आवयोर्विकृतं रूपमुत्तमाङ्गेन दूषितम् ।।१३।।
शापाच्छचीपतेस्तत्र युवामाज्ञातुमर्हथः ।
ततः प्रोवाच भगवान् वायुश्च निर्ऋतिस्तथा ।। १४।।
गौतम्यां स्नानकरणाच्छापमोक्षो भविष्यति ।
इत्युक्त्वा तावुभौ प्रीतौ तत्रैवान्तरधीयताम् ।।१५।।
ततोऽञ्जनां समादाय अद्रिः पैशाचमूर्तिमान् ।
भ्रातुर्हनुमतः प्रीत्यै स्नापयामास मातरम् ।।१६।
तथैव हनुमान् गङ्गामादायाद्रिमतित्वरन् ।
मार्जाररूपिणीं नीत्वा गौतम्यास्तीरमाप्तवान् ।।१७।।
ततः प्रभृति तत्तीर्थं पैशाचं चाञ्जनं तथा ।
ब्रह्मणो गिरिमासाद्य सर्वकामप्रदं शुभम् ।।१८।।
योजनानां त्रिपञ्चाशन् मार्जारं पूर्वतो भवेत् ।
मार्जारसंज्ञितात्तस्माद्धनूमन्तं वृषाकपिम् ।।१९।।
फेनासंगममाख्यातं सर्वकामप्रदं शुभम् ।
तस्य स्वरूपं व्युष्टिश्च तत्रैव प्रोच्यते शुभा ।।२०।।
इति श्रीब्रह्मपुराणगतगौतमीमाहात्म्ये तीर्थमाहात्म्ये
पैशाचतीर्थवर्णनं नाम चतुर्दशोऽध्यायः ।

* * *

## (३)

# महर्षी अगस्तीमुनींच्या सहयोगाने इंद्र पापमुक्त

ब्रह्मपुराणातील सहविसाव्या अध्यायात इंद्राच्या पापमुक्तीची कथा आली आहे. ब्रह्मदेव, महर्षी अगस्त्य व अन्य ऋषी यांच्या प्रयत्नामुळे वृत्रासुर वधानंतर इंद्राला ब्रह्महत्येचे पातक लागले होते. ते पातक नष्ट करण्यासाठी मोठे प्रयास करावे लागले–

ब्रह्मदेव नारदांना सांगतात, ''वृत्रासुर वधानंतर ब्रह्महत्येचे पातक इंद्रांना लागलेले पाहून हरि, हर आणि मी स्वतः भयभीत झालो होतो. भीतीने इंद्र एक सरोवरातील कमळाच्या देठात लपून बसले; परंतु त्यांच्याबरोबर ब्रह्महत्येचे पातकही हजार वर्षे त्यांच्यासोबतच राहिले. देवराज इंद्रच नाहिसे झाले.''

''त्यातून ते कसे मुक्त झाले?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''सर्व देव, विष्णू, गौतम, अगस्त्य, अत्री, कश्यप आदि सर्व ऋषी आणि शिव विचारार्थ बसलो. योग्य स्थानाचा विचार करून मी त्यांना म्हणालो, गौतमी नदीत इंद्रांना अभिषेक केल्यानंतर इंद्र पापमुक्त होतील. आम्ही सर्व इंद्रांना घेऊन गौतमीवर आलो; परंतु गौतमीला पृथ्वीवर आणणाऱ्या गौतम ऋषींना हे आवडले नाही. गुरुपत्नीच्या शय्येवर चढणाऱ्या अतिशय पापी अशा इंद्रांना अभिषेक करणाऱ्यांना, मी भस्मसात करून टाकीन. तेव्हा असुर शत्रू देव आणि ऋषींनी येथून ताबडतोब निघून जावे. तेव्हा वाद नको म्हणून आम्ही सर्व नर्मदातीरी आलो; परंतु येथे मांडव्य ऋषींना राग आला. त्यांनीही सर्वांना जाळून टाकण्याची प्रतिज्ञा केली.''



''यातून बाहेर कसे पडलात?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव सांगू लागले, ''अगस्त्यादि ऋषी आणि देव यांनी मांडव्यांची स्तुती करून समजूत घातली. (श्लोक– १५, १६, १७) तेव्हा मांडव्यांनी मान्यता दिली. तेथे आम्ही सर्वांनी इंद्रांना अभिषेक करून मलरहीत केले. अगस्त्यांच्या इच्छेप्रमाणे देव, ऋषी, विष्णू, मी, शिव, गौतम, अत्री, कश्यप, पन्नगांसह यक्ष सर्वांनी ठरविल्याप्रमाणे गौतमी गंगेचे पाणी कमंडलूत भरून आणले. त्या पाण्याने इंद्रांना अभिषेक केल्यानंतर इंद्र पापमुक्त झाले. त्या पाण्याच्या पुण्या आणि सिक्ता अशा दोन नद्या झाल्या. त्या पुन्हा गंगेला येऊन मिळाल्या. या तीर्थावर मुनींचा (अगस्त्यांचा) सदैव वास असतो. त्यावेळेपासून पुण्या संगमतीर्थ असे तीर्थाला नाव मिळाले तर सिक्ता संगमाला ऐंद्र तीर्थ नाव मिळाले. हे पापनाशन सर्व देव, सर्व ऋषी यांच्या सहयोगाने घडले त्यामुळे या तीर्थाला सात हजार पावन तीर्थांचे सामर्थ्य मिळाले. या तीर्थात काया, वाचा, मनाने स्नानपूर्वक प्रायश्चित्त घेतल्यास सर्व पापातून मुक्त होता येते.''

अशा रीतीने श्रीब्रह्मपुराणातल्या गौतमी माहात्म्यातल्या तीर्थमाहात्म्यात आलेला पुण्यासिक्तासंगमेंद्रतीर्थादि सप्तसहस्रतीर्थवर्णनम् नावाचा सहविसावा अध्याय संपला.

* * *

# अथ षड्विंशोऽध्यायः ।

ब्रह्मोवाच ।
इन्द्रतीर्थमिति ख्यातं ब्रह्महत्याविनाशनम् ।
स्मरणादपि पापौघक्लेशसंघविनाशनम् ।।१।।
पुरा वृत्रवधे वृत्ते ब्रह्महत्या तु नारद ।
शचीपतिं चानुगताबिभ्यद्दृष्ट्वा तु तां हरिः ।।२।।
इन्द्रस्ततो वृत्रहन्ता इतश्चेतश्च धावति ।
यत्र यत्र त्वसौ याति हत्या सापीन्द्रगामिनी ।।३।।
स महत्सर आविश्य पद्मनालमुपागमत् ।
तत्रासौ तन्तुवद् भूत्वा वासं चक्रे शचीपतिः ।।४।।
सरस्तीरेऽपि हत्यासीद् दिव्यं वर्षसहस्रकम् ।
एतस्मिन्नन्तरे देवा निरिन्द्रा ह्यभवन् मुने ।।५।।
मन्त्रयामासुरव्यग्राः कथमिन्द्रो भवेदिति ।
तत्राहमवदं देवान् हत्यास्थानं प्रकल्प्य च ।।६।।
इन्द्रस्य पावनार्थाय गौतम्यामभिषिच्यताम् ।
यत्राभिषिक्तः पूतात्मा पुनरिन्द्रो भविष्यति ।।७।।
तथा ते निश्चयं कृत्वा गौतमीं शीघ्रमागमन् ।
तत्र स्नातं सुरपतिं देवाश्च ऋषयस्तथा ।।८।।
अभिषेक्तुकामास्ते सर्वे शचीकान्तं च तस्थिरे ।
अभिषिच्यमानमिन्द्रं तं प्रकोपाद् गौतमोऽब्रवीत् ।।९।।
गौतम उवाच ।
अभिषेक्ष्यन्ति पापिष्ठं महेन्द्रं गुरुतल्पगम् ।
तान्सर्वान् भस्मसात्कुर्यां शीघ्रं यान्त्वसुरारयः ।।१०।।
ब्रह्मोवाच ।
तदृषेर्वचनं श्रुत्वा परिहृत्य च गौतमीम् ।
नर्मदामगमन्सर्व इन्द्रमादाय सत्वराः ।।११।।



उत्तरे नर्मदातीरे अभिषेकाय तस्थिरे ।
अभिषेक्ष्यमाणमिन्द्रं तं माण्डव्यो भगवानृषिः ।।१२।।
अब्रवीद् भस्मसात्कुर्यां यदि स्यादभिषेचनम् ।
पूजयामासुरमरा माण्डव्यं युक्तिभिः स्तवैः ।।१३।।
देवा ऊचुः ।
अयमिन्द्रः सहस्राक्षो यस्मिन् देशेऽभिषिच्यते ।
तत्रातिदारुणं विघ्नं मुने समुपजायते ।।१४।।
तच्छान्तिं कुरु कल्याण प्रसीद वरदो भव ।
मलनिर्यातनं यस्मिन्कुर्मस्तस्मिन्वरान्बहून् ।।१५।।
देशे दास्यामहे सर्वे तदनुज्ञातुमर्हसि ।
यस्मिन्देशे सुरेन्द्रस्य अभिषेको भविष्यति ।।१६।।
स सर्वकामदः पुंसां धान्यवृक्षफलैर्युतः ।
नानावृष्टिर्न दुर्भिक्षं भवेदत्र कदाचन ।।१७।।
ब्रह्मोवाच ।
मेने ततो मुनिश्रेष्ठो माण्डव्यो लोकपूजितः ।
अभिषेकः कृतस्तत्र मलनिर्यातनं तथा ।।१८।।
देवैस्तदोक्तो मुनिभिः स देशो मालवस्ततः ।
अभिषिक्ते सुरपतौ जाते च विमले तदा ।।१९।।
आनीय गौतमीं गङ्गां तं पुण्यायाभिषेचिरे ।
सुराश्च ऋषयश्चैव अहं विष्णुस्तथैव च ।।२०।।
वसिष्ठो गौतमश्चापि अगस्त्योऽत्रिश्च कश्यपः ।
एते चान्ये च ऋषयो देवा यक्षाः सपन्नगाः ।।२१।।
स्नानं तत्पुण्यतोयेन अकुर्वन्नभिषेचनम् ।
मया पुनः शचीभर्ता कमण्डलुभवेन च ।।२२।।
वारिणाप्यभिषिक्तश्च तत्र पुण्याभवन्नदी ।
सिक्ता चेति च तत्रासीत्ते गङ्गायां च संगते ।।२३।।
संगमौ तत्र विख्यातौ सर्वदा मुनिसेवितौ ।
ततः प्रभृति तत्तीर्थं पुण्यासंगममुच्यते ।।२४।।

सिक्तायाः संगमे पुण्यमैन्द्रं तदभिधीयते ।
तत्र सप्त सहस्राणि तीर्थान्यासञ्शुभानि च ।।२५।।
तेषु स्नानं च दानं च विशेषेण तु संगमे ।
सर्वं तदक्षयं विद्यानन्नात्र कार्या विचारणा ।।२६।।
यदेतत्पुण्यमाख्यानं यः पठेच्च शृणोति वा ।
सर्वपापैः स मुच्येत मनोवाक्कायकर्मजैः ।।२७।।
इति श्रीब्रह्मपुराणगतगौतमीमाहात्म्ये तीर्थमाहात्म्ये पुण्यासिक्तासंगमेन्द्रतीर्थादिसप्तसहस्रतीर्थवर्णनं नाम षड्विंशोऽध्यायः ।

* * *



## (४)

# महर्षी अगस्त्यांच्या मार्गदर्शनाने विंध्य, अश्वत्थ व पिप्पल गर्वहरण तथा अश्वत्थादि सहस्त्रतीर्थ निर्मिती

ब्रह्मपुराणाच्या अठ्ठेचाळीसाव्या अध्यायात महर्षी अगस्त्यांच्या विंध्य उल्लंघन आणि कैटभपुत्र अश्वत्थ आणि पिप्पल अशा धर्मकंटक राक्षसांच्या गर्वहरण कथा येतात. या कथा दक्षिणेकडील गोदावरीच्या दक्षिण व उत्तर तीरावर सौरी तथा शनैश्वर तपोभूमीशी जोडलेल्या आहेत. ते तीर्थ मंदतीर्थ म्हणूनही प्रसिद्ध आहे. विंध्य ओलांडून महर्षी अगस्त्य लोपामुद्रांसह गोदावरीच्या तपोभूमीत दक्षिणेकडे तप तथा यज्ञसत्र करू लागले. या कालावधीत महर्षी अगस्त्यांच्या लीला प्रकटल्या आहेत.

ब्रह्मदेव नारदांना म्हणाले, ‘‘पूर्वी सूर्य आणि चंद्र यांचे मार्गक्रमण अडवून स्वतःची श्रेष्ठता अहंभावाने सिद्ध करण्यासाठी विंध्य पर्वत वृद्धींगत होत होता. सर्व देवांनी महर्षी अगस्त्यांना विंध्य पर्वताला विनंती करण्यासाठी पाठविले होते. महर्षी अगस्त्यमुनी हजार मुनींच्या घोळक्यासह विंध्याकडे गेले. विंध्याने केलेले आदरातिथ्य स्वीकारल्यानंतर लोपामुद्रा पती, धैर्यशील, विद्वान व योजक अशा महर्षी अगस्त्यांनी अनेक वृक्षांनी गजबजलेल्या, मेरू आणि सूर्याशी स्पर्धा करणाऱ्या, शेकडो शिखरांनी वेढलेल्या, अतिशय उंच जाणाऱ्या त्या पर्वताची सर्व ब्राह्मणांना बरोबर घेऊन स्तुती केली. देवांच्या विनंतीनुसार कार्य पार पाडण्यासाठी महर्षी अगस्त्य विंध्य पर्वताला म्हणाले–

‘हे नग श्रेष्ठा, मी या साक्षात्कारी मुनींबरोबर तीर्थयात्रा करावी म्हणून दक्षिण दिशेला निघालो आहे. हे नगाधिपते, मला वाट दे. या याचकाचे आतिथ्य करणे, तुझा धर्म आहे. जोपर्यंत मी परत येत नाही तोपर्यंत तू तसाच नम्रपणे स्थिर रहा.’ – विंध्यांनी अगस्त्यांचे म्हणणे मान्य केले?’’ नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ‘‘त्या श्रेष्ठ पर्वताने ‘तथास्तु’ म्हणून मुनींचे म्हणणे मान्य केले. नंतर अगस्त्यमुनी दक्षिण दिशा पादाक्रांत करीत त्या सर्व मुनींसह गौतमीवर आले. तेथे मुनींसमवेत सत्रयागाची दीक्षा घेऊन मुनींसमवेत सत्र पार पाडत होते; परंतु...’’

‘‘परंतु काय पिताश्री?’’ नारदांनी कुतुहलाने विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ‘‘कैटभ या महाराक्षसाचे पुत्र अश्वत्थ आणि पिप्पल हे पापी राक्षस आणि धर्मकंटक म्हणून प्रसिद्ध होते. अश्वत्थ, अश्वत्त वृक्षाचे रूप घेऊन व पिप्पल, ब्राह्मणाचे रूप घेऊन यज्ञाचा विध्वंस करण्यासाठी सत्राच्या ठिकाणी घुसले. ते या मुनींना पिडत होते. जो ब्राह्मण अश्वत्थाला हात लावील त्याला तो वृक्ष खाऊन टाकीत असे; तर पिप्पल राक्षस सामगायक होऊन अगस्त्य शिष्यांना खाऊन टाकीत असे. ब्राह्मण कमी होत असलेले पाहून अश्वत्थ आणि पिप्पल हे दोघे राक्षस आहेत, असे महर्षी अगस्ती मुनींच्या लक्षात आले. तेव्हा महर्षी अगस्त्यांसह सर्व मुनीगण दक्षिणतीरावर असलेल्या व्रतस्थ, तपस्वी, मंद शनैश्वराकडे गेले व त्यांना राक्षसांची क्रूर चेष्टा वर्णन केली. त्यावर सौरी शनैश्वर म्हणाले– ‘माझे तप पूर्ण झाल्यानंतर मी राक्षसांना मारीन. तोवर मी असमर्थ आहे.’ त्यावर सर्व मुनींनी सौरीला, आपण आपले भरपूर तप देतो असे सांगून सत्वर कार्य करण्याचा आग्रह धरला. शनैश्वरांनी ते मान्य करून ते कार्यास निघाले.’’

‘‘हे पिताश्री, शनैश्वरांनी हे कार्य कसे पूर्ण केले?’’ नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ‘‘ब्राह्मणाचा वेष घेऊन सौरी अश्वत्थाकडे गेला आणि त्याने अश्वत्थाला प्रदक्षिणा घातली. प्रदक्षिणा घालणारा ब्राह्मणच आहे असे वाटून अश्वत्थाने नेहमीप्रमाणे त्या ब्राह्मणाला मायेने खाऊन टाकले. सूर्यपुत्र शनैश्वराने आतड्यात शिरून, त्या पापी राक्षसाकडे पाहिले. त्या दृष्टीने राक्षस क्षणात भस्मसात झाला. त्याचा नाश केल्यानंतर शनैश्वर नम्र अशा ब्राह्मण वेषात असलेल्या पिप्पलापुढे ब्राह्मणरूपाने गेला. ब्राह्मण वेषातील पिप्पलाने पूर्वीप्रमाणे ब्राह्मणरूपातील भानुपुत्राला खाऊन टाकले. पिप्पलाच्या आतड्यात प्रवेश मिळताच, आपल्या तीव्र दृष्टीने पिप्पलाला भस्मसात केले आणि तो मंदसौरी, शनैश्वर, सूर्यपुत्र महर्षी अगस्त्यांकडे आला व त्याने महर्षींची आज्ञा मागितली. महर्षी अगस्त्यांनी त्याला वरदान मागण्यास सांगितले. त्यावर शनैश्वर म्हणाले– ‘माझ्या दाराशी जे नियमितपणे अश्वत्थाला स्पर्श करतील, त्यांची सर्व कार्ये पार पडतील व त्यांना कधीही माझी पीडा होणार नाही. हे देवर्षे, अशुभ संकेताने अशांत झालेले त्रस्त लोक ‘माझ्यासाठी ताबडतोब शांत कर’ या मंत्राचे शिवाचे ध्यान करीत जे लोक अश्वत्थाला स्पर्श करतील, त्यांची पीडा दूर होवो–’ असे वरदान शनैश्वराने मागितले. अगस्त्यांनी ‘तथास्तु’ म्हणून त्याला वरदान दिले. तेव्हापासून गौतमीच्या या दक्षिणोत्तर स्थलांना शनैश्वर, अगस्त्य, सात्रिक, याज्ञिक आणि सामग तीर्थ अशी नावे मिळाली. सूर्यपुत्र मंदसौरी व महर्षी अगस्त्य यांच्या प्रभावामुळे आठ हजार सोळा तीर्थांचे सामर्थ्य या तीर्थाला लाभले.

अशा रीतीने ब्रह्मपुराणातल्या गौतमी माहात्म्यातला अश्वत्थाद्यष्टोत्तर – षोडश सहस्त्रतीर्थवर्णनम् नावाचा अठ्ठेचाळीसावा अध्याय इथे संपला.

* * *

# अथ अष्टचत्वारिंशोऽध्यायः ।

ब्रह्मोवाच ।
अश्वत्थतीर्थमाख्यातं पिप्पलं च ततः परम् ।
उत्तरे मन्दतीर्थं तु तत्र व्युष्टिमितः शृणु ।।१।।
पुरा त्वगस्त्यो भगवान् दक्षिणाशापतिः प्रभुः ।
देवैस्तु प्रेरितः पूर्वं विन्ध्यस्य प्रार्थनं प्रति ।।२।।
स शनैर्विन्ध्यमभ्यागात्सहस्रमुनिभिर्वृतः ।
तमागत्य नगश्रेष्ठं बहुवृक्षसमाकुलम् ।।३।।
स्पर्धिनं मेरुभानुभ्यां विन्ध्यं शृङ्गशतैर्वृतम् ।
अत्युन्नतं नगं धीरो लोपामुद्रापतिर्मुनिः ।।४।।
कृतातिथ्यो द्विजैः सार्धं प्रशस्य च नगं पुनः ।
इदमाह मुनिश्रेष्ठो देवकार्यार्थसिद्धये ।।५।।
अगस्त्य उवाच ।
अहं यामि नगश्रेष्ठ मुनिभिस्तत्त्वदर्शिभिः ।
तीर्थयात्रां करोमीति दक्षिणाशां व्रजाम्यहम् ।।६।।
देहि मार्गं नगपते आतिथ्यं देहि याचते ।
यावदागमनं मे स्यात्स्थातव्यं तावदेव हि ।।७।।
नान्यथा भवितव्यं ते तथेत्याह नगोत्तमः ।
आक्रामन् दक्षिणामाशां तैर्वृतो मुनिभिर्मुनिः ।।८।।
शनैः स गौतमीमागात्सत्रयागाय दीक्षितः ।
यावत्संवत्सरं सत्रमकरोदृषिभिर्वृतः ।।९।।
कैटभस्य सुतौ पापौ राक्षसौ धर्मकण्टकौ ।
अश्वत्थः पिप्पलश्चेति विख्यातौ त्रिदशालये ।।१०।।
अश्वत्थोऽश्वत्थरूपेण पिप्पलो ब्रह्मरूपधृक् ।
तावुभावन्तरं प्रेप्सू यज्ञविध्वंसनाय तु ।।११।।
कुरुतां काङ्क्षितं रूपं दानवौ पापचेतसौ ।
अश्वत्थो वृक्षरूपेण पिप्पलो ब्राह्मणाकृतिः ।।१२।।
उभौ तौ ब्राह्मणान्नित्यं पीडयेतां तपोधन ।
आलभन्ते च येऽश्वत्थं तांस्तानवात्यसौ तरुः ।।१३।।
पिप्पलः सामगो भूत्वा शिष्यानश्नाति राक्षसः ।
तस्मादद्यापि विप्रेषु सामगोऽतीव निष्कृपः ।। १४।।
क्षीयमाणान् द्विजान् दृष्ट्वा मुनयो राक्षसाविमौ ।
इति बुद्ध्वा महाप्रज्ञा दक्षिणं तीरमाश्रितम् ।।१५।।
सौरिं शनैश्चरं मन्दं तपस्यन्तं धृतव्रतम् ।
गत्वा मुनिगणाः सर्वे रक्षःकर्म न्यवेदयन् ।।१६।।
सौरिर्मुनिगणानाह पूर्णे तपसि मे द्विजाः ।
राक्षसौ हन्म्यपूर्णेन तपसाक्षम एव हि ।।१७।।
पुनः प्रोचुर्मुनिगणा दास्यामस्ते तपो महत् ।
इत्युक्तो ब्राह्मणैः सौरिः कृतमित्याह तानपि ।।१८।।
सौरिर्ब्राह्मणवेषेण प्रायादश्वत्थरूपिणम् ।
राक्षसं ब्राह्मणो भूत्वा प्रदक्षिणमथाकरोत् ।।१९।।
प्रदक्षिणं तु कुर्वाणं मेने ब्राह्मणमेव तम् ।
नित्यवद्राक्षसः पापो भक्षयामास मायया ।।२०।।
तस्य कार्य समाविश्य चक्षुषान्त्राण्यपश्यत ।
दृष्टः स राक्षसः पापो मन्देन रविसूनुना ।।२१।।
भस्मीभूतः क्षणेनैव गिरिर्वज्रहतो यथा ।
अश्वत्थं भस्मसात्कृत्वा अन्यं ब्राह्मणरूपिणम् ।।२२।।
राक्षसं पापनिलयमेक एव तमभ्यगात् ।
अधीयानो विप्र इव शिष्यरूपो विनीतवत् ।।२३।।
पिप्पलः पूर्ववच्चापि भक्षयामास भानुजम् ।
स भक्षितः पूर्ववच्च कुक्षावन्त्राण्यवैक्षत ।।२४।।
तेनालोकितमात्रोऽसौ राक्षसो भस्मसादभूत् ।
उभौ हत्वा भानुसुतः किं कृत्यं मे वदन्त्वथ ।।२५।।
मुनयो जातसंहर्षाः सर्व एव तपस्विनः ।
ततः प्रसन्ना ह्यभवन्नृषयोऽगस्त्यपूर्वकाः ।।२६।।

वरान्ददुर्यथाकामं सौरये मन्दगामिने ।
स प्रीतो ब्राह्मणानाह शनिः सूर्यसुतो बली ।।२७।।
सौरिरुवाच ।
मद्वारे नियता ये च कुर्वन्त्यश्वत्थलम्भनम् ।
तेषां सर्वाणि कार्याणि स्युः पीडा मद्भवा न च ।।२८।।
तीर्थे चाश्वत्थसंज्ञे वै स्नानं कुर्वन्ति ये नराः ।
तेषां सर्वाणि कार्याणि भवेयुरपरो वरः ।।२९।।
चक्षुष्पंदं भुजस्पंदं दुःस्वप्नं दुर्विचिन्तनम् ।
शत्रूणां च समुत्थानं शमयाश्वत्थ चाशु मे ।।३०।।
मन्त्रेणानेन देवर्षे शिवध्यानपरायणाः ।
मन्दवारे तु येऽश्वत्थं प्रातरुत्थाय मानवाः ।
आलभन्ते च तेषां वै ग्रहपीडा व्यपोहतु ।।३१।।
ब्रह्मोवाच ।
ततः प्रभृति तत्तीर्थमश्वत्थं पिप्पलं विदुः ।
तीर्थं शनैश्चरं तत्र तत्रागस्त्यं च सात्रिकम् ।।३२।।
याज्ञिकं चापि तत्तीर्थं सामगं तीर्थमेव च ।
इत्याद्यष्टोत्तराण्यासन्सहस्राण्यथ षोडश ।
तेषु स्नानं च दानं च सर्वयागफलप्रदम् ।।३३।।
इति श्रीब्रह्मपुराणगतगौतमीमाहात्म्येऽश्वत्थाद्यष्टोत्तरषोडशसहस्र-
तीर्थवर्णनं नामाष्टचत्वारिंशोऽध्यायः ।

* * *



## (५)

# गौतमी गंगा आणि महर्षी अगस्त्यमुनी कृपेने एकोणपन्नास मरुतांचे कल्याण

ब्रह्मदेव आणि नारद यांच्यात गौतमी माहात्म्याविषयी संवाद सुरू होता. तेव्हा नारदांनी विचारले, ‘‘पुत्रतीर्थ असे या तीर्थाचे नाव कसे प्रकटले?’’ ब्रह्मदेव म्हणाले, ‘‘नारदा, या तीर्थाला पुण्यतीर्थ असेही म्हणतात. तसेच अनेक नावे या तीर्थाला मिळाली आहेत. त्याची कथा मी तुला सांगतो– कश्यप पत्नी अदिती–दिती आणि दनु यांच्या पुत्रांविषयीची ही कथा आहे. अदितीची मुले म्हणजे देव, दितीची मुले दैत्य आणि दनुची दानव. अदितीची मुले सर्वच बाबतीत गुणी व संख्येनेही जास्त होऊ लागली; तर दिती आणि दनु यांची मुले सर्वच बाबतीत कमी झाली. या दुःखाने दितीने दनुजवळ दुःख व्यक्त केले.’’

दिती म्हणाली, ‘‘आपला नवरा, धर्म, गोत्र, रूप एकच असूनसुद्धा अदितीची कीर्ती वाढते आहे व आपली नाही. मला पराकोटीचे दुःख होत आहे. काय करू या?’’

ब्रह्मदेव नारदांना म्हणाले, ‘‘परमेष्ठी पुत्र कश्यपांची पूजा आदि आटोपल्यानंतर त्यांनी दितीचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. ज्याची इच्छा असते ते पुण्यानेच प्राप्त होते’’ असे म्हणून तिला उपदेश केला. तिने नम्रपणे ऐकला. त्यानंतर दिती आणि दनु यांनी एकमेकीत विचारविनिमय केला. नवरा खूष झाला तर तुझ्या इच्छा पूर्ण होतील असे दनुने दितीस सांगितले. दितीने सर्वप्रकारे कश्यपांना खूष केले. तेव्हा भगवान कश्यप प्रजापती यांनी दितीला, काय हवे ते माग असे मनोगत व्यक्त करावयास सांगितले. त्यावर दितीने वर मागितला.’’

दिती विनयाने पतीला म्हणाली, ''हे सुरपित्या, ज्याला जन्म दिल्याने मी वीरमाता ठरेन असा गुणी, जगज्जेता, जगद्वंद्य पुत्र मी वर म्हणून मागते.''

कश्यप म्हणाले, ''पापे नष्ट करणारे व मनोरथ सिद्धीस नेणारे, बारा वर्षांनी फळ देणारे एक व्रत मी तुला सांगतो. ते पूर्ण झाल्यावर मी येऊन तुला हवा तसा गर्भ तुझ्या ठिकाणी ठेवीन.''

ब्रह्मदेव नारदांना म्हणाले, ''दितीने योग्य प्रकारे व्रत पूर्ण केले. व्रत पूर्ण झाल्यावर कश्यपांनी गर्भधारणा केली; परंतु ते दितीशी एकांतात बोलले.''

''काय बोलले?'' नारदांनी विचारले. तेव्हा ब्रह्मदेवांनी, कश्यपांनी दितीला केलेला उपदेश त्यांच्याच शब्दात निवेदित केला– कश्यप म्हणाले, ''धर्माने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे वागावे, निंदा करू नये, पहाटे व संध्याकाळी झोपू नये, केस मोकळे सोडू नये, संध्याकाळी भूतयोनी एकत्र येतात तेव्हा जेवणे, शिंकणे व जांभया देणे वर्ज्य करावे, सर्वांसमोर हसू नये, संध्याकाळी घरात थांबू नये, रात्री किंवा दिवसा मुसळ, उखळ, सूप, चौरंग, झाकणे वगैरे ओलांडून जाऊ नये, उत्तरेकडे डोके करून झोपू नये, परपुरुषास पाहू नये या सर्व नियमांचे पालन केल्यास तुला त्रैलोक्यीच्या ऐश्वर्याला योग्य असा पुत्र होईल.''

ब्रह्मदेव म्हणाले, ''नारदा, दितीने पतीला नियम पाळण्याचे वचन दिले व गरोदरपणाचा काळ सुरक्षितपणे व्यतित करण्यासाठी तिने महर्षी अगस्ती मुनींच्या आश्रमाचा आश्रय घेतला. कारण कश्यप सुरांकडे निघून गेले होते. इकडे दितीचा गर्भ वाढत होता, हे मायेमुळे मय दैत्याला नेमके माहिती झाले. त्याने मित्रवर्य इंद्राला हे वृत्त सांगितले.''

नारदांनी मय हा इंद्राने ठार केलेल्या आवडत्या भावाचा म्हणजे नमूचीचा बंधू असूनही त्याची इंद्राशी मैत्री कशी? असे विचारले. त्यावर ब्रह्मदेवांनी, मय इंद्रांचा मित्र कसा झाला, याची कथा सांगितली. (श्लोक क्र. ३२ ते ४९ – मागे श्लोक दिले आहेत.)

मयाने इंद्रांना वृत्त सांगितले व इंद्रांना माया विद्याही दिली. इंद्र प्रसन्न होऊन, काय करावे हे सांग असे मयांना म्हणाले. ब्रह्मदेवांनी मयाच्या शब्दात मयाचे मनोगत नारदांना सांगितले– मय म्हणाला, ''अगस्त्यांच्या आश्रमात जा. तिथे दिती गर्भवती आहे. तिची काही दिवस शुश्रुषा करत रहा. मग तिच्या गर्भात प्रवेश करून, हे वज्रधारी इंद्रा, तिचा वाढत असलेला गर्भ तुझ्या कह्यात आण किंवा मरेपर्यंत वज्राने कापून काढ म्हणजे शत्रूच रहाणार नाही.'' इंद्रांनी मान्य करून इंद्र दैत्यमाता दितींची शुश्रुषा करायला अगस्त्य आश्रमात गेला. दितीला, अदितीपुत्र इंद्राच्या मनात काय आहे ते कळले नाही.

''पुढे काय झाले?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''गर्भात प्रवेश करण्याची इच्छा असलेला इंद्र वज्र घेऊन बराच वेळ वाट पहात राहिला. एकदा चुकून उत्तरेकडे डोके करून झोपलेल्या दितीला इंद्राने पाहिले. ही योग्य वेळ आहे असे जाणून इंद्र तिच्या कुशीत शिरला. कश्यपांचे तेज असलेला आतील निर्भय गर्भ इंद्राला म्हणाला– तुम्ही भावाला मारण्याची इच्छा करीत आहात. रणभूमी आणि रण नसताना मारणे हे मोठे पातक आहे. ते आपल्याला शोभत नाही. तुम्ही सुरेंद्र आहात. युद्धाची इच्छा असेलच तर मी बाहेर कसा येईल हे पहा. संकटात निःशस्त्र असलेल्या मला न मारता वाटेतून बाजूला व्हा. उत्तम कुळात जन्मलेले लोक कधीही निंद्य कर्म करीत नाहीत. तरीही आपण माझ्याशी युद्ध करणारच असाल तर मी मूठ पुढे करून तुमच्यापुढे उभा आहे. तुम्ही बालघातक, भ्रातृघातक आणि विश्वासघातक ठराल. तुमच्या आज्ञेमुळे विश्व चालते; तोच मला मारायला बघतो आहे यात पौरुष कुठले?''

ब्रह्मदेव नारदांना म्हणाले, ''गर्भ नीतीने बोलत असतानाही मायाप्राप्त, क्रोधांध इंद्राने तो गर्भ कापला. त्याचे तुकडे तुकडे केले; परंतु एकोणपन्नास तुकडे केल्यानंतरही ते तुकडे पूर्ण पुत्र स्वरूपात प्रकटले. हेच एकोणपन्नास मरुत होत. त्याच्यात कोणतीही विकृती नव्हती. हे पाहून इंद्राला आश्चर्य वाटले. ते सर्व पुत्र रडू लागले. त्यांनी गर्भातूनच अगस्त्य ऋषींना घडलेला प्रकार रडत रडत सांगितला. (श्लोक ७० ते ७६) अगस्त्य गोंधळात पडले. त्यांनी दितीला जागे केले आणि आपल्या आश्रयाला असलेल्या मित्रपत्नी दितीच्या बाबतीत असे घडणे त्यांना सहन झाले नाही. त्यांनी इंद्राला शापवाणी उच्चारली– 'कुठल्याही युद्धात शत्रूला इंद्राची नेहमी पाठ दिसेल'– या शापवाणीने इंद्र भयभीत झाला. त्याचवेळी दितीनेही इंद्राला शाप दिला– 'स्त्रियांकडून तुझा पराभव होईल आणि तू राज्यभ्रष्ट होशील'–

एवढ्यात कश्यप प्रजापती तेथे आले. त्यांना सर्व वृत्त समजले. दुःख झाले. त्यांनी सर्व लोकपालांना घेऊन, माझ्याकडे (ब्रह्मदेवाकडे) यायचे ठरविले. ते सर्व माझ्याकडे आल्यावर दिती गर्भाची शांती, इंद्रांसाठी उःशाप, गर्भातील एकोणपन्नास मरुद्‌गण यांची इंद्राशी मैत्री, अगस्त्यांनी दिलेल्या शापातून मुक्तता अशा सर्व बाबतीत क्रमाक्रमाने मला विचारले. (श्लोक ८८, ८९, ९०) कश्यपांचे दुःख पाहून मी त्यांना गौतमीवर जाऊन स्नानादि कर्मे करून, महेशांची स्तुती करण्याचा उपाय सुचविला.''

''पुढे काय झाले?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''कश्यपांनी शिवस्तुती आरंभली व शिव प्रसन्न झाले. (श्लोक ९५ ते १०१) कश्यपांनी शिवांना सर्व वृत्त सांगितले. शिवांनी अभय देऊन, एकोणपन्नास भाऊ मरुत यांना इंद्राबरोबर आहुती मिळतील. इंद्र व मरुत एकत्र असतांना त्यांना कोणीही पराभूत करू शकणार नाही असे वरदान दिले. नंतर त्यांनी महर्षी अगस्त्यांना इंद्रावरील क्रोध नष्ट करावा कारण मरुद्‌गण अमर झाले आहेत, असे सांगून शांत केले. दितीलाही वर मागण्यास सांगून शांत केले. दितीने, पुत्र अमर झाल्याचे ऐकून कृतार्थता प्रकट केली. महर्षी अगस्त्य आणि गौतमी गंगा यांच्या प्रसादाने व शिवांच्या आशीर्वादाने आपण कृतार्थ झालो आहोत असे निवेदन केले (श्लोक ११५ ते १२०) व पुत्राच्या संबंधात या तीर्थक्षेत्री सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात असे मागणे मागितले. शंकरांनी 'तथास्तु' म्हणत तीर्थाला सर्वतोपरी बळ दिले.'' (श्लोक १२१ ते १३६)

पुढे ब्रह्मदेव म्हणाले, ''त्यामुळे या तीर्थाला पुत्रतीर्थ असे नाव मिळाले. तर मरुत आणि इंद्र यांची मैत्री घडल्याने मित्रतीर्थ हेही नाव मिळाले. शक्र तथा इंद्र पापमुक्त झाले म्हणून शक्रतीर्थ असेही नाव मिळाले तर इंद्रांना वैभव मिळाले म्हणून कमलातीर्थ असेही नाव मिळाले. ही सर्व लीला माझ्या (ब्रह्मदेव) कृपेने व महर्षी अगस्त्यांच्या इच्छेने घडली. म्हणून या तीर्थाला लक्षतीर्थ असे म्हणू लागले. लक्षतीर्थाचे सामर्थ्य या तीर्थात सामावले आहे. (श्लोक १३७ ते १४१)

अशा रीतीने श्रीब्रह्मपुराणातल्या गौतमी माहात्म्यातल्या तीर्थमाहात्म्यात आलेला पुत्रतीर्थादिलक्षतीर्थवर्णनम् नावाचा चोपन्नावा अध्याय संपला.



## अथ चतुःपञ्चाशोऽध्यायः ।

ब्रह्मोवाच ।
पुत्रतीर्थमिति ख्यातं पुण्यतीर्थं तदुच्यते ।
सर्वान्कामानवाप्नोति यन्महिम्नः श्रुतेरपि ।।१।।
तस्य स्वरूपं वक्ष्यामि शृणु यत्नेन नारद ।
दितेः पुत्राश्च दनुजाः परिक्षीणा यदाभवन् ।
अदितेस्तु सुता ज्येष्ठाः सर्वभावेन नारद ।।२।।
तदा दितिः पुत्रवियोगदुःखात्संस्पर्धमाना दनुमाससाद ।।३।।
दितिरुवाच
क्षीणाः सुता आवयोरेव भद्रे किं कुर्महे कर्म लोके गरीयः ।
पश्यादितेर्वंशमभिन्नमुत्तमं सौराज्ययुक्तं यशसा जयश्रिया ।।४।।
जितारिमभ्युन्नतकीर्तिधर्मं मच्चित्तसंहर्षविनाशदक्षम् ।
समानभर्तृत्वसमानधर्मे समानगोत्रेऽपि समानरूपे ।।५।।
न जीवयेयं श्रियमुन्नतिं च जीर्णास्मि दृष्ट्वा त्वदितिप्रसूतान् ।
कामप्यवस्थामनुयामि दुःस्थाऽदितेर्विलोक्याथ परां समृद्धिम् ।
दावप्रवेशोऽपि सुखाय नूनम् स्वप्नेऽप्यवेक्ष्या न सपत्नलक्ष्मीः ।।६।।
ब्रह्मोवाच ।
एवं ब्रुवाणामतिदीनवक्त्रां विनिश्वसन्तीं परमेष्ठिपुत्रः ।
कृताभिपूजो विगतश्रमस्तां स सान्त्वयन्नाह मनोभिरामाम् ।।७।।
परमेष्ठिपुत्र उवाच ।
खेदो न कार्यः समभीप्सितं यत्तत् प्राप्यते पुण्यत एव भद्रे ।
तत्साधनं वेत्ति महानुभावः प्रजापतिस्ते स तु वक्ष्यतीति ।।८।।
साध्व्येतत्सर्वभावेन प्रश्रयावनता सती ।।९।।
ब्रह्मोवाच ।
एवं ब्रुवाणां च दितिं दनुः प्रोवाच नारद ।।१०।।

दनुरुवाच ।
भर्तारं कश्यपं भद्रे तोषयस्व निजैर्गुणैः ।
तुष्टो यदि भवेद्भर्ता ततः कामानवाप्स्यसि ।।११।।
ब्रह्मोवाच ।
तथेत्युक्त्वा सर्वभावैस्तोषयामास कश्यपम् ।
दितिं प्रोवाच भगवान् कश्यपोऽथ प्रजापतिः ।।१२।।
कश्यप उवाच ।
किं ददामि तवाभीष्टं दिते वरय सुव्रते ।।१३।।
ब्रह्मोवाच ।
दितिरप्याह भर्तारं पुत्रं बहुगुणान्वितम् ।
जेतारं सर्वलोकानां सर्वलोकनमस्कृतम् ।।१४।।
येन जातेन लोकेऽस्मिन् भवेयं वीरपुत्रिणी ।
तं वरेयं सुरपतिरित्याह विनयान्विता ।।१५।।
कश्यप उवाच ।
उपदेक्ष्ये व्रतं श्रेष्ठं द्वादशाब्दफलप्रदम् ।
तत आगत्य ते गर्भमाधास्ये यन्मनोगतम् ।
निष्पापतायां जातायां सिध्यन्ति हि मनोरथाः ।।१६।।
ब्रह्मोवाच ।
भर्तृवाक्याद्दितिः प्रीता तं नमस्यायतेक्षणा ।
उपदिष्टं व्रतं चक्रे भर्त्रादिष्टं यथाविधि ।।१७।।
तीर्थसेवापात्रदानव्रतचर्यादिवर्जिताः ।
कथमासादयिष्यन्ति प्राणिनोऽत्र मनोरथान् ।।१८।।
ततश्चीर्णे व्रते तस्यां दित्यां गर्भमधारयत् ।
पुनः कान्तामथोवाच कश्यपस्तां दितिं रहः ।।१९।।
कश्यप उवाच ।
न प्राप्नुवन्ति यत्कामान्मुनयोऽपि तपस्स्थिताः ।
यथाविहितकर्माङ्गावज्ञया तच्छुचिस्मिते ।।२०।।
निन्दितं च न कर्तव्यं संध्ययोरुभयोरपि ।
न स्वप्तव्यं न गन्तव्यं मुक्तकेशी च नो भव ।।२१।।



भोक्तव्यं सुभगे नैव क्षुतं वा जृम्भणं तथा ।
संध्याकाले न कर्तव्यं भूतसंघसमाकुले ।।२२।।
सान्तर्धानं सदा कार्यं हसितं तु विशेषतः ।
गृहान्तदेशे संध्यासु न स्थातव्यं कदाचन ।।२३।।
मुशलोलूखलादीनि शूर्पपीठपिधानकम् ।
नैवातिक्रमणीयानि दिवा रात्रौ सदा प्रिये ।।२४।।
उदक्शीर्षं तु शयनं न संध्यासु विशेषतः
वक्तव्यं नानृतं किंचिन् नान्यगेहाटनं तथा ।।२५।।
कान्तादन्यो न वीक्ष्यस्तु प्रयत्नेन नरः क्वचित् ।
इत्यादिनियमैर्युक्ता यदि त्वमनुवर्तसे ।
ततस्ते भविता पुत्रस्त्रैलोक्यैश्वर्यभाजनम् ।।२६।।
ब्रह्मोवाच ।
तथेति प्रतिजज्ञे सा भर्तारं लोकपूजितम् ।
गतश्च कश्यपो ब्रह्मन्नितश्चेतः सुरान् प्रति ।।२७।।
दितेर्गर्भोऽपि ववृधे बलवान् पुण्यसंभवः ।
एतत्सर्वं मयो दैत्यो मायया वेत्ति तत्त्वतः ।।२८।।
इन्द्रस्य सख्यमभवन्मयेन प्रीतिपूर्वकम् ।
मयो गत्वा रहः प्राह इन्द्रं स विनयान्वितः ।।२९।।
दितेर्दनोरभिप्रायं व्रतं गर्भस्य वर्धनम् ।
तस्य वीर्यं च विविधं प्रीत्येन्द्राय न्यवेदयत् ।।३०।।
विश्वासैकगृहं मित्रमपायत्रासवर्जितम् ।
अर्जितं सुकृतं नानाविधं चेत्तदवाप्यते ।।३१।।
नारद उवाच ।
नमुचेश्च प्रियो भ्राता मयो दैत्यो महाबलः ।
भ्रातृहन्त्रा कथं मैत्र्यं मयस्यासीत्सुरेश्वर ।।३२।।
ब्रह्मोवाच ।
दैत्यानामधिपश्चासीद्बलवान् नमुचिः पुरा ।
इन्द्रेण वैरमभवद्भीषणं लोमहर्षणम् ।।३३।।

युद्धं हित्वा कदाचिद्धो गच्छन्तं तु शतक्रतुम् ।
दृष्ट्वा दैत्यपतिः शूरो नमुचिः पृष्ठतोऽन्वगात् ।।३४।।
तमायान्तमभिप्रेक्ष्य शचीभर्ता भयातुरः ।
ऐरावतं गजं त्यक्त्वा इन्द्रः फेनमथाविशत् ।।३५।।
स वज्रपाणिस्तरसा फेनेनैवाहनद्रिपुम् ।
नमुचिर्नाशमगमत्तस्य भ्राता मयोऽनुजः ।।३६।।
भ्रातृहन्तृविनाशाय तपस्तेपे मयो महत् ।
मायां च विविधामाप देवानामतिभीषणाम् ।।३७।।
वरांश्चावाप्य तपसा विष्णोर्लोकपरायणात् ।
दानशौण्डः प्रियालापी तदाभवदसौ मयः ।।३८।।
अग्नींश्च ब्राह्मणान्पूज्य जेतुमिन्द्रं कृतक्षणः ।
दातारं च तदार्थिभ्यः स्तूयमानं च बन्दिभिः ।।३९।।
विदित्वा मघवा वायोर्मयं मायाविनं रिपुम् ।
उपक्रान्तं सुयुद्धाय विप्रो भूत्वा तमभ्यगात् ।
शचीभर्ता मयं दैत्यं प्रोवाचेदं पुनः पुनः ।।४०।।
इन्द्र उवाच ।
देहि दैत्यपते मह्यमर्थिनेऽपेक्षितं वरम् ।
त्वां श्रुत्वा दातृतिलकमागतोऽहं द्विजोत्तमः ।।४१।।
ब्रह्मोवाच ।
मयोऽपि ब्राह्मणं मत्वाऽवदद्दत्तं मया तव ।
विचारयन्ति कृतिनो बह्वल्पं वा पुरोऽर्थिनि ।।४२।।
इत्युक्ते तु हरिः प्राह संख्यमिच्छे ह्यहं त्वया ।
इन्द्रं मयः पुनः प्राह किमनेन द्विजोत्तम ।।४३।।
न त्वया मम वैरं भोः स्वस्तीत्याह हरिर्मयम् ।
तत्त्वं वदेति स हरिर्दैत्येनोक्तः स्वकं वपुः ।।४४।।
दर्शयामास दैत्याय सहस्राक्षं यदुच्यते ।
ततः सविस्मयो दैत्यो मयो हरिमुवाच ह ।।४५।।
मय उवाच ।
किमिदं वज्रपाणिस्त्वं तवायोग्या कृतिः सखे ।।४६।।

ब्रह्मोवाच ।
विहस्याथ परिष्वज्य वृत्तमित्यब्रवीद्धरिः ।
केनापि साधयन्त्यत्र पण्डिताश्च समीहितम् ।।४७।।
ततः प्रभृति शक्रस्य मयेन महती ह्यभूत् ।
सुप्रीतिर्मुनिशार्दूल मयो हरिहितः सदा ।।४८।।
इन्द्रस्य भवनं गत्वा तस्मै सर्वं न्यवेदयत् ।
किं मे कृत्यमिति प्राह मयं मायाविनं हरिः ।।४९।।
हरये च मयो मायां प्रादात्प्रीत्या तथा हरिः ।
प्राप्तः संप्रीतिमानाह किं कृत्यं मय तद्वद ।।५०।।
मय उवाच ।
अगस्त्यस्याश्रमं गच्छ तत्रास्ते गर्भिणी दितिः ।
तस्याः शुश्रूषणं कुर्वन्नास्स्व तत्र कियन्ति च ।।५१।।
अहानि मघवंस्तस्या गर्भमाविश्य वज्रधृक् ।
वर्धमानं च तं छिन्धि यावद्वश्योऽथवा मृतिम् ।
प्राप्नोति तावद्वज्रेण ततो न भविता रिपुः ।।५२।।
ब्रह्मोवाच ।
तथेत्युक्त्वा मयं पूज्य मघवानेक एव हि ।
विनीतवत्तदा प्रायाद्दितिं मातरमञ्जसा ।।५३।।
शुश्रूषमाणस्तां देवीं शक्रो दैतेयमातरम् ।
सा न जानाति तच्चित्तं शक्रस्य द्विषतो दितिः ।।५४।।
गर्भे स्थितं तु यद्भूतं देवेन्द्रस्य विचेष्टितम् ।
अमोघं तन्मुनेस्तेजः कश्यपस्य दुरासदम् ।।५५।।
ततः प्रगृह्य कुलिशं सहस्राक्षः पुरंदरः ।
अन्तःप्रवेशकामोऽसौ बहुकालं समावसन् ।।५६।।
संध्योदक्शीर्षनिद्रां तामवेक्ष्य कुलिशायुधः ।
इदमन्तरमित्युक्त्वा दित्याः कुक्षिं समाविशत् ।।५७।।
अन्तर्वर्ति च यद्भूतमिन्द्रं दृष्ट्वा धृतायुधम् ।
हन्तुकामं तदोवाच पुनः पुनरभीतवत् ।।५८।।

गर्भस्थ उवाच ।
किं मां न रक्षसे वज्रिन् भ्रातरं त्वं जिघांससि ।
नारणे मारणादन्यत्पातकं विद्यते महत् ।।५९।।
ऋते युद्धान्महाबाहो शक्र युध्यस्व निर्गते ।
मयि तस्मान्नैतदेवं तवं युक्तं भविष्यति ।।६०।।
शतक्रतुः सहस्राक्षः शचीभर्ता पुरंदरः ।
वज्रपाणिः सुरेन्द्रस्त्वं ते न युक्तं भवेत्प्रभो ।।६१।।
अथवा युद्धकामस्त्वं मम निष्क्रमणं यथा ।
तथा कुरु महाबाहो मार्गादस्मादपासर ।।६२।।
कुमार्गे न प्रवर्तन्ते महान्तोऽपि विपद्गताः ।
अविद्यश्चाप्यशस्त्रश्च नैव चायुधसंग्रहः ।।६३।।
त्वं विद्यावान् वज्रपाणे मां निघ्नन्किं न लज्जसे ।
कुर्वन्ति गर्हितं कर्म न कुलीनाः कदाचन ।।६४।।
हत्वा वा किं तु जायेत यशो वा पुण्यमेव वा ।
वध्यन्ते भ्रातरः कामाद्गर्भस्थाः किं नु पौरुषम् ।।६५।।
यदि वा युद्धभक्तिस्ते मयि भ्रातरसंशयम् ।
ततो मुष्टिं पुरस्कृत्य वज्रिणेऽसौ व्यवस्थितः ।।६६।।
बालघाती ब्रह्मघाती तथा विश्वासघातकः ।
एवंभूतं फलं शक्र कस्मान्मां हन्तुमुद्यतः ।।६७।।
यस्याज्ञया सर्वमिदं वर्तते सचराचरम् ।
स हन्ता बालकं मां वै किं यशः किं तु पौरुषम् ।।६८।।
ब्रह्मोवाच ।
एवं ब्रुवन्तं तं गर्भं चिच्छेद कुलिशेन सः ।
क्रोधान्धानां लोभिनां च न घृणा क्वापि विद्यते ।। ६९।।
न ममार ततो दुःखादाहुस्ते भ्रातरो वयम् ।
पुनश्चिच्छेद तान्खण्डान्मा वधीरिति चाब्रुवन् ।।७०।।
विश्वस्तान्मातृगर्भस्थान्निजभ्रातृञ्शतक्रतो ।
द्वेषविध्वस्तबुद्धीनां न चित्ते करुणाकणः ।।७१।।

एवं तु खण्डितं खण्डं हस्तपादादिजीववत् ।
निर्विकारं ततो दृष्ट्वा सप्तसप्त सुविस्मितः ।।७२।।
एकवद्बहुरूपाणि गर्भस्थानि शुभानि च ।
रुदन्ति बहुरूपाणि मा रुतेत्यब्रवीद्धरिः ।।७३।।
ततस्ते मरुतो जाता बलवन्तो महौजसः ।
गर्भस्था एव तेऽन्योन्यमूचुः शक्रं गतभ्रमाः ।।७४।।
अगस्त्यं मुनिशार्दूलं माता यस्याश्रमे स्थिता ।
अस्मत्पिता तव भ्राता सख्यं ते बहु मन्यते ।।७५।।
अस्मानुपरि सस्नेहं मनस्ते विद्महे मुने ।
न यत्करोति श्वपचः प्रवृत्तस्तत्र वज्रधृक् ।।७६।।
इत्येतद्वचनं श्रुत्वा अगस्त्योऽगात्ससंभ्रमः ।
दितिं संबोधयामास व्यथितां गर्भवेदनात् ।।७७।।
तत्रागस्त्यः शचीकान्तमशपत्कुपितो भृशम् ।।७८।।
अगस्त्य उवाच ।
संग्रामे रिपवः पृष्ठं पश्येयुस्ते सदा हरे ।
जीवतामेव मरणमेतदेव हि मानिनाम् ।
पृष्ठं पलायमानानां यत्पश्यन्त्यहिता रणे ।।७९।।
ब्रह्मोवाच ।
सापि तं गर्भसंस्थं च शशापेन्द्रं रुषा दितिः ।।८०।।
दितिरुवाच ।
न पौरुषं कृतं तस्माच्छापोऽयं भविता तव ।
स्त्रीभिः परिभवं प्राप्य राज्यात्प्रभ्रश्यसे हरे ।।८१।।
ब्रह्मोवाच ।
एतस्मिन्नन्तरे तत्र कश्यपो वै प्रजापतिः ।
प्रायाच्च व्यथितोऽगस्त्याच्छ्रुत्वा शक्रविचेष्टितम् ।
गर्भान्तरगतः शक्रः पितरं प्राह भीतवत् ।।८२।।
शक्र उवाच ।
अगस्त्याच्च दितेश्चैव बिभेमि क्रमितुं बहिः ।।८३।।

ब्रह्मोवाच ।
भार्यासमीपमापन्नः कश्यपोऽपि प्रजापतिः ।
पुत्रकर्म च तद्दृष्ट्वा गर्भान्तःस्थितिमेव च ।
दितिशापमगस्त्यस्य श्रुत्वासौ दुःखितोऽभवत् ।।८४।।
कश्यप उवाच ।
निर्गच्छ शक्र पुत्रैतत्पापं किं कृतवानसि ।
न निर्मलकुलोत्पन्ना मनः कुर्वन्ति पातके ।।८५।।
ब्रह्मोवाच ।
स निर्गतो वज्रपाणिः सव्रीडोऽधोमुखोऽब्रवीत् ।
तन्मूर्तिरिव वदति सदसच्चेष्टितं नृणाम् ।।८६।।
शक्र उवाच ।
यदुक्तमत्र श्रेयः स्यात्तत्कर्ताहमसंशयम् ।।८७।।
ब्रह्मोवाच ।
ततो ममान्तिकं प्रायाल्लोकपालैः स कश्यपः ।
सर्वं वृत्तमथोवाच पुनः पप्रच्छ मां सुरैः ।।८८।।
दितिगर्भस्य वै शान्तिं सहस्राक्षविशापताम् ।
गर्भस्थानां च सर्वेषामिन्द्रेण सह मित्रताम् ।।८९।।
तेषामारोग्यतां चापि शचीभर्तुरदोषताम् ।
अगस्त्यदत्तशापस्य विशापत्वमपि क्रमात् ।।९०।।
ततोऽहमब्रवं वाक्यं कश्यपं विनयान्वितम् ।
प्रजापते कश्यप त्वं वसुभिर्लोकपालकैः ।।९१।।
इन्द्रेण सहितः शीघ्रं गौतमीं याहि मानद ।
तत्र स्नात्वा महेशानं स्तुहि सर्वैः समन्वितः ।।९२।।
ततः शिवप्रसादेन सर्वं श्रेयो भवेदिति ।
तथेत्युक्त्वा जगामासौ कश्यपो गौतमीं तदा ।।९३।।
स्नात्वा तुष्टाव देवेशमेभिरेव पदक्रमैः ।
सर्वदुःखापनोदाय द्वयमेव प्रकीर्तितम् ।
गौतमी वा पुण्यनदी शिवो वा करुणाकरः ।।९४।।



कश्यप उवाच ।
पाहि शंकर देवेश पाहि लोकनमस्कृत ।
पाहि पावन वागीश पाहि पन्नगभूषण ।।९५।।
पाहि धर्म वृषारूढ पाहि वेदत्रयेक्षण ।
पाहि गोधर लक्ष्मीश पाहि शर्व गजाम्बर ।।९६।।
पाहि त्रिपुरहन्नाथ पाहि सोमार्धभूषण ।
पाहि यज्ञेश सोमेश पाह्यभीष्टप्रदायक ।।९७।।
पाहि कारुण्यनिलय पाहि मङ्गलदायक ।
पाहि प्रभव सर्वस्य पाहि पालक वासव ।।९८।।
पाहि भास्कर वित्तेश पाहि ब्रह्मनमस्कृत ।
पाहि विश्वेश सिद्धेश पाहि पूर्ण नमोऽस्तु ते ।।९९।।
घोरसंसारकान्तारसंचारोद्विग्नचेतसाम् ।
शरीरिणां कृपासिन्धो त्वमेव शरणं शिव ।।१००।।
ब्रह्मोवाच ।
एवं संस्तुवतस्तस्य पुरतोऽभूद्वृषध्वजः ।
वरेण च्छन्दयामास कश्यपं तं प्रजापतिम् ।।१०१।।
कश्यपोऽपि शिवं प्राह विनीतवदिदं वचः ।
स प्राह विस्तरेणाथ इन्द्रस्य तु विचेष्टितम् ।।१०२।।
शापं नाशं च पुत्राणां परस्परममित्रताम् ।
पापप्राप्तिं तु शक्रस्य शापप्राप्तिं तथैव च ।
ततो वृषाकपिः प्राह दितिं चागस्त्यमेव च ।।१०३।।
शिव उवाच ।
मरुतो ये भवत्पुत्राः पञ्चाशच्चैकवर्जिताः ।
सर्वे भवेयुः सुभगा भवेयुर्यज्ञभागिनः ।।१०४।।
इन्द्रेण सहिता नित्यं वर्तयेयुर्मुदान्विताः ।।१०५।।
इन्द्रस्य तु हविर्भागो यत्र यत्र मखे भवेत् ।
आदौ तु मरुतस्तत्र भवेयुर्नात्र संशयः ।।१०६ ।।
मरुद्भिः सहितं शक्रं न जयेयुः कदाचन ।
जेता भवेत्सर्वदैव सुखं तिष्ठ प्रजापते ।।१०७।।

अद्यप्रभृति ये कुर्युरनयाद्भ्रातृघातनम् ।
वंशच्छेदो विपत्तिश्च नित्यं तेषां भविष्यति ।।१०८।।
ब्रह्मोवाच ।
अगस्त्यमृषिशार्दूलं शंभुरप्याह यत्नतः ।।१०९।।
शंभुरुवाच ।
न कुर्यास्त्वं तु कोपं च शचीभर्तरि वै मुने ।
शमं व्रज महाप्राज्ञ मरुतस्त्वमरा भवन् ।।११०।।
ब्रह्मोवाच ।
दितिं चापि शिवः प्राह प्रसन्नो वृषभध्वजः ।।१११।।
शिव उवाच ।
एको भूयान्मम सुतस्त्रैलोक्यैश्वर्यमण्डितः ।
इत्येवं चिन्तयन्ती त्वं तपसे नियताभवः ।।११२।।
तदेतत्सफलं तेऽद्य पुत्रा बहुगुणाः शुभाः ।
अभवन्बलिनः शूरास्तस्माज्जहि मनोरुजम् ।
अन्यानपि वरान्सुभ्रूर्याचस्व गतसंभ्रमा ।।११३।।
ब्रह्मोवाच ।
तदेतद्वचनं श्रुत्वा देवदेवस्य सा दितिः ।
कृताञ्जलिपुटा नत्वा शंभुं वाक्यमथाब्रवीत् ।।११४।।
दितिरुवाच ।
लोके यदेतत्परमं यत्पित्रोः पुत्रदर्शनम् ।
विशेषेण तु तन्मातुः प्रियं स्यात्सुरपूजित ।।११५।।
तत्रापि रूपसंपत्तिशौर्यविक्रमवान्भवेत् ।
एकोऽपि तनयः किंतु बहवश्चेत्किमुच्यते ।।११६।।
मत्पुत्रास्ते प्रभावाच्च जेतारो बलिनो ध्रुवम् ।
इन्द्रस्य भ्रातरः सत्यं पुत्राश्चैव प्रजापतेः ।।११७।।
अगस्त्यस्य प्रसादाच्च गङ्गायाश्च प्रसादतः ।
यत्र देव प्रसादस्ते तच्छुभं कोऽत्र संशयः ।।११८।।
कृतार्थाहं तथापि त्वां भक्त्या विज्ञापयाम्यहम् ।
शृणुष्व देव वचनं कुरुष्व च जगद्धितम् ।। ११९।।



ब्रह्मोवाच ।
वदेत्युक्ता जगद्धात्रा दितिर्नम्राब्रवीदिदम् ।।१२०।।
दितिरुवाच ।
संततिप्रापणं लोके दुर्लभं सुरवन्दित ।
विशेषेण प्रियं मातुः पुत्रश्चेत्किं नु वर्ण्यते ।।१२१।।
स चापि गुणवाञ्छ्रीमानायुष्मान्यदि जायते ।
किं तु स्वर्गेण मोक्षेण पारमेष्ट्यपदेन वा ।।१२२।।
सर्वेषामपि भूतानामिहामुत्र फलैषिणाम् ।
गुणवत्पुत्रसंप्राप्तिरभीष्टा सर्वदैव च ।
तस्मादाप्लवनादत्र क्रियतां समनुग्रहः ।।१२३।।
शकर उवाच ।
महापापफलं चेदं यदेतदनपत्यता ।
स्त्रिया वा पुरुषस्यापि वन्ध्यत्वं यदि जायते ।।१२४।।
तदत्र स्नानमात्रेण तद्दोषो नाशमाप्नुयात् ।
स्नात्वा तत्र फलं दद्यात्स्तोत्रमेतच्च यः पठेत् ।।१२५।।
स तु पुत्रमवाप्नोति त्रिमासस्नानदानतः ।
अपुत्रिणी त्वत्र स्नानं कृत्वा पुत्रमवाप्नुयात् ।।१२६।।
ऋतुस्नाता तु या काचित्तत्र स्नाता सुतांल्लभेत् ।
त्रिमासाभ्यन्तरं या तु गुर्विणी भक्तितस्त्विह ।।१२७।।
फलैः स्नात्वा तु मां पश्येत्स्तोत्रेण स्तौति मां तथा ।
तस्याः शक्रसमः पुत्रो जायते नात्र संशयः ।।१२८।।
पितृदोषैश्च ये पुत्रं न लभन्ते दिते शृणु ।
धनापहारदोषैश्च तत्रैषां निष्कृतिः परा ।।१२९।।
तत्रैषां पिण्डदानेन पितणां प्रीणनेन च ।
किंचित्सुवर्णदानेन ततः पुत्रो भवेद्ध्रुवम् ।।१३०।।
ये न्यासाद्यपहर्तारो रत्नापह्नवकारकाः ।
श्राद्धकर्मविहीनाश्च तेषां वंशो न वर्धते ।।१३१।।
दोषिणां तु परेतानां गतिरेषा भवेदिति
संततिर्जायतां श्लाघ्या जीवतां तीर्थसेवनात् ।।१३२।।

संगमे दितिगङ्गायाः स्नात्वा सिद्धेश्वरं प्रभुम् ।
अनाद्यपारमजरं चित्सदानन्दविग्रहम् ।।१३३।।
देवर्षिसिद्धगन्धर्वयोगीश्वरनिषेवितम् ।
लिङ्गात्मकं महादेवं ज्योतिर्मयमनामयम् ।।१३४।।
पूजयित्वोपचारैश्च नित्यं भक्त्या यतव्रतः ।
स्तोत्रेणानेन यः स्तौति चतुर्दश्यष्टमीषु च ।।१३५।।
यथाशक्त्या स्वर्णदानं ब्राह्मणानां च भोजनम् ।
यः करोत्यत्र गङ्गायां स पुत्रशतमाप्नुयात् ।।१३६।।
संप्राप्य सकलान्कामानन्ते शिवपुरं व्रजेत् ।
स्तोत्रेणानेन यः कश्चिद्यत्र क्वापि स्तवीति माम् ।
षण्मासात्पुत्रमाप्नोति अपि वन्ध्याप्यशङ्कितम् ।।१३७।।
ब्रह्मोवाच ।
ततः प्रभृति तत्तीर्थं पुत्रतीर्थमुदाहृतम् ।
तत्र तु स्नानदानाद्यैः सर्वकामानवाप्नुयात् ।।१३८।।
मरुद्भिः सह मैत्र्येण मित्रतीर्थं तदुच्यते ।
निष्पापत्वेन चेन्द्रस्य शक्रतीर्थं तदुच्यते ।।१३९।।
ऐन्द्रीं श्रियं यत्र लेभे तत्तीर्थं कमलाभिधम् ।
एतानि सर्वतीर्थानि सर्वाभीष्टप्रदानि हि ।।१४०।।
सर्वं भविष्यतीत्युक्त्वा शिवश्चान्तरधीयत ।
कृतकृत्याश्च ते जग्मुः सर्व एव यथागतम् ।
तीर्थानां पुण्यदं तत्र लक्षमेकं प्रकीर्तितम् ।। १४१ ।।
इति श्रीब्रह्मपुराणगतगौतमीमाहात्म्ये स्वयंभुनारदसंवादे तीर्थमाहात्म्ये पुत्रतीर्थादिलक्षतीर्थवर्णनं नाम चतुःपञ्चाशोऽध्यायः ।

* * *



## (६)

# महर्षी आपस्तंब आश्रमात महर्षी अगस्त्यांचे शंकानिरसनात्मक तत्त्व प्रतिपादन

ब्रह्मपुराणांतील गौतमी माहात्म्याच्या साठाव्या अध्यायात महर्षी अगस्त्यांनी आपस्तंब ऋषींच्या शंकांचे निरसन करीत तत्त्व प्रतिपादन केले आहे. एक प्रकारचे हे उपनिषद स्वरूप तत्त्व प्रतिपादन आहे. ब्रह्मदेवांनी आपस्तंब आणि महर्षी अगस्त्य यांच्यात घडलेला संवाद देवर्षी नारदांना कथन केला आहे. ब्रह्मदेव नारदांना म्हणाले, ''सर्व पापांच्या राशी नाहिशा करणारे गौतमी गंगेवरील आपस्तंब तीर्थाच्या ठिकाणी आपस्तंब ऋषींचा आश्रम होता. त्यांच्या पत्नीचे नाव अक्षसूत्रा व पुत्राचे नाव कर्की असे होते. हे तिघेही तत्त्ववेत्ते होते. त्यांचा मोठा शिष्यसमुदाय आश्रमात तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात गढून असे. एकदा त्यांच्या आश्रमात भगवान महर्षी अगस्त्यमुनी आले. महर्षी आपस्तंबांनी सर्वांसमवेत भगवान अगस्त्यांची पूजा करून, त्यांना धर्मतत्त्वज्ञानाविषयी अनेक प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.''

ब्रह्मदेव नारदांना म्हणाले, ''तीन देवांपैकी कोणाची पूजा करावी? भोग आणि मोक्ष कोणाकडून मिळतील? अन्नदाता कोण आहे? कोण अनंत आहे? देवांचेही दैवत असा कोण आहे? यज्ञाच्या सहाय्याने कोणाला आहुती दिली जाते? आणि वेदांमध्ये कोणाचे गान केले आहे? हे प्रश्न विचारून आपस्तंबांनी आपल्या शंका दूर करण्याची विनंती भगवान अगस्त्यांना केली.''

''ही तर भगवान अगस्त्यांचीच परीक्षा घेतल्यासारखे आहे.'' नारद

म्हणाले.

ब्रह्मदेव नारदांना सांगू लागले, ''भगवान अगस्त्य म्हणाले- शब्द हे धर्म, अर्थ, काम आणि मोक्षासाठी प्रमाण आहे. त्यातही पुन्हा वैदिक शब्द हा श्रेष्ठ प्रमाण मानलेला आहे. वेदांनी ज्याची स्तुती केली आहे तो परात्पर म्हणजे सगळ्यात श्रेष्ठ पुरुष आहे. अपर हा मर्त्य आणि पर हा अमृत आहे, असे म्हटले जाते. जो अमूर्त आहे तो पर जाणावा आणि अपर हा मूर्त आहे असे म्हटले जाते. गुणांच्या अभिव्याप्तीवरून मूर्त हा तीन प्रकारचा आहे. एकच असला तरी तोच ब्रह्मा, विष्णू आणि शिव असा तीन प्रकारे सांगितला आहे. तीनही देवांच्या द्वारा जाणून घ्यायचे आहे ते एकच आणि ते म्हणजे परतत्त्व होय. गुण आणि कर्म यांच्यानुसार हे एकच परतत्त्व अनेक ठिकाणी व्यापून आहे. लोकांवर उपकार करण्यासाठी त्याची तीन रूपे आहेत.

पुढे भगवान अगस्त्य म्हणाले- ज्याला हे परमतत्त्व कळते तोच विद्वान आहे. त्यांच्यामध्ये (त्रिदेवांमध्ये) भेद आहे असे जो सांगतो, त्याला लिंगभेदी म्हणतात. त्याच्यानुसारच तीनही देवांच्या वेगवेगळ्या मूर्ती आहेत. सर्व साकारांच्या बाबतीत हे स्वतंत्रपणे प्रमाण आहे; पण जे निराकार आहे असे (परतत्त्व) ते त्या सगळ्यापेक्षा श्रेष्ठ मानलेले आहे.''

''आपस्तंबांनी या तत्त्वनिवेदनावर कोणती प्रतिक्रिया दिली?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''नारदा, आपस्तंबांनी अगस्त्यांच्या तत्त्वनिवेदनातून कोणतीच गोष्ट ठामपणे लक्षात येत नाही, असे म्हणून निःसंशय आणि विकल्परहीत असे तत्त्वरहस्य आम्हास सांगावे, अशी विनंती केली.''

''महर्षी अगस्त्यांना संताप नाही आला?'' नारदांनी शंका व्यक्त केली.

ब्रह्मदेव म्हणाले, ''भगवान महर्षी अगस्त्यमुनी शांतपणे बोलू लागले- जरी देवांमध्ये एकमेकात फरक नसला तरी सर्व सिद्धि मिळतात त्या सुखात्मक शिवांमुळे. मी या प्रपंचाचे कारण आहे ती ज्योत म्हणजे श्रेष्ठ शिवच होत. त्यांना प्रसन्न केल्यामुळे गौतमीच्या दंडकवनात रहाणारे शिव पापांच्या सर्व राशी नाहीशा करतात म्हणून ते भोग व मुक्ती देणारे आहेत. त्यांना (शिवांना) निर्माता, पालनकर्ता, दाता आणि प्रलयकर्ता असे म्हणतात. यातील ब्रह्म्याचे



रूप हे कर्त्याचे आहे (निर्मात्याचे), विष्णूचे पालनकर्त्याचे आणि रुद्राचे संहाराचे, असे सगळ्या वेदांत सांगितले आहे.''

''त्यावर आपस्तंब काय बोलले?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''भगवान अगस्त्यांकडून वेदप्रामाण्यासह आपस्तंबांना पूर्ण ज्ञान मिळाले. ते अतिशय आनंदित झाले. त्यांनी सत्य, सर्वव्यापी, सर्वात्मक अशा शिवांना मी शरण जातो, असे घोषित केले आणि भगवान अगस्त्यांच्या मार्गदर्शनामुळे त्यांची पत्नी अक्षसूत्रा, पुत्र कर्की आपल्या समस्त शिष्यगणांसह भगवान अगस्त्यांच्या आशीर्वादासह पवित्र अशा गौतमी गंगेत शुचिर्भूत होऊन व्रतनियमांचे पालन करीत शिवस्तोत्र गाऊ लागले. शिवांसाठी आहुती प्रदान करू लागले व सर्वकल्याणासाठी शिवभक्ती करू लागले. ते पूर्ण शिवरूप झाल्यावर भगवंत शिव प्रसन्न झाले. त्यांनी स्वतःसाठी व इतरांसाठी वरदान मागावयास सांगितले. त्यावर भक्तीने शिवरूप झालेल्या आपस्तंबांनी गंगेचे स्नान करून, जे शिवशंकरांचे दर्शन घेतील त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात असे दान मागितले. शिव अधिकच प्रसन्न होऊन 'तथास्तु' म्हणाले. असे सर्वकल्याणाचे दान आपस्तंबांनी मागितल्यापासून भगवान अगस्तीमुनींच्या प्रसादाने व शिवकृपेने या तीर्थाला आपस्तंब तीर्थ असे नाव मिळाले.

अशा रीतीने श्रीब्रह्मपुराणातल्या गौतमी माहात्म्यातल्या तीर्थमाहात्म्यात आलेला दक्षिणकूलस्थापस्तम्ब सोमेश्वरतीर्थवर्णनम् नावाचा साठावा अध्याय संपला.

* * *

## अथ षष्टितमोऽध्यायः ।

ब्रह्मोवाच ।
आपस्तम्बमिति ख्यातं तीर्थं त्रैलोक्यविश्रुतम् ।
स्मरणादप्यशेषाघसंघविध्वंसनक्षमम् ।।१।।
आपस्तम्बो महाप्राज्ञो मुनिरासीन्महायशाः ।
तस्य भार्याक्षसूत्रेति पतिधर्मपरायणा ।।२।।
तस्य पुत्रो महाप्राज्ञः कर्किनामाथ तत्त्ववित् ।
तस्याश्रममनुप्राप्तो ह्यगस्त्यो मुनिसत्तमः ।।३।।
तमगस्त्यं पूजयित्वा आपस्तम्बो मुनीश्वरः ।
शिष्यैरनुगतो धीमांस्तं प्रष्टुमुपचक्रमे ।।४।।
आपस्तम्ब उवाच ।
त्रयाणां को नु पूज्यः स्याद्देवानां मुनिसत्तम ।
भुक्तिर्मुक्तिश्च कस्माद्स्यादन्नदाता च को भवेत् ।।५।।
अनन्तश्चापि को विप्र देवानामपि दैवतम् ।
यज्ञैः क इज्यते देवः को वेदेष्वनुगीयते ।
एतं मे संशयं छेत्तुं वदागस्त्य महामुने ।।६।।
अगस्त्य उवाच ।
धर्मार्थकाममोक्षाणां प्रमाणं शब्द उच्यते ।
तत्रापि वैदिकः शब्दः प्रमाणं परमं मतः ।।७।।
वेदेन गीयते यस्तु पुरुषः स परात्परः ।
मृतोऽपरः स विज्ञेयो ह्यमृतः पर उच्यते ।।८।।
योऽमूर्तः स परो ज्ञेयो ह्यपरो मूर्त उच्यते ।
गुणाभिव्याप्तिभेदेन मूर्तोऽसौ त्रिविधो भवेत् ।।९।।
ब्रह्मा विष्णुः शिवश्चेति एक एव त्रिधोच्यते ।
त्रयाणामपि देवानां वेद्यमेकं परं हि तत् ।।१०।।
एकस्य बहुधा व्याप्तिर्गुणकर्मविभेदतः ।
लोकानामुपकारार्थमाकृतित्रितयं भवेत् ।।११।।



यस्तत्त्वं वेत्ति परमं स च विद्वान्न चेतरः ।
तत्र यो भेदमाचष्टे लिङ्गभेदी स उच्यते ।।१२।।
प्रायश्चित्तं न तस्यास्ति यश्चैषां व्याहरेद्भिदम् ।
त्रयाणामपि देवानां मूर्तिभेदः पृथक् पृथक् ।।१३।।
वेदाः प्रमाणं सर्वत्र साकारेषु पृथक् पृथक् ।
निराकारं च यत्त्वेकं तत्तेभ्यः परमं मतम् ।।१४।।
आपस्तम्ब उवाच ।
नानेन निर्णयः कश्चिन्मयात्र विदितो भवेत् ।
तत्राप्यत्र रहस्यं यत्तद् विमृश्याशु कीर्त्यताम् ।
निःसंशयं निर्विकल्पं भाजनं सर्वसंपदाम् ।।१५।।
ब्रह्मोवाच ।
एतदाकर्ण्य भगवानगस्त्यो वाक्यमब्रवीत् ।।१६।।
अगस्त्य उवाच ।
यद्यप्येषां न भेदोऽस्ति देवानां तु परस्परम् ।
तथापि सर्वसिद्धिः स्याच्छिवादेव सुखात्मनः ।।१७।।
प्रपञ्चस्य निमित्तं यत्तज्ज्योतिश्च परं शिवः ।
तमेव साधय हरं भक्त्या परमया मुने ।
गौतम्यां सकलाघौघसंहर्ता दण्डके वने ।।१८।। ब्रह्मोवाच ।
एतच्छ्रुत्वा मुनेर्वाक्यं परां प्रीतिमुपागतः ।
भुक्तिदो मुक्तिदः पुंसां साकारोऽथ निराकृतिः ।।१९।।
सृष्ट्याकारस्ततः प्रोक्तः पालनाकार एव च ।
दाता च हन्ति सर्वं यो यस्मादेतत्समाप्यते ।।२०।।
अगस्त्य उवाच ।
ब्रह्माकृतिः कर्तृरूपा वैष्णवी पालनी तथा ।
रुद्राकृतिर्निहन्त्री सा सर्ववेदेषु पठ्यते ।।२१।।
ब्रह्मोवाच ।
आपस्तम्बस्तदा गङ्गा गत्वा स्नात्वा यतव्रतः ।
तुष्टाव शंकरं देवं स्तोत्रेणानेन नारद ।।२२।।

आपस्तम्ब उवाच ।
काष्ठेषु वह्निः कुसुमेषु गन्धो बीजेषु वृक्षादि दृषत्सु हेम ।
भूतेषु सर्वेषु तथास्ति यो वै तं सोमनाथं शरणं व्रजामि ।।२३।।
यो लीलया विश्वमिदं चकार धाता विधाता भुवनत्रयस्य ।
यो विश्वरूपः सदसत्परो यः सोमेश्वरं तं शरणं व्रजामि ।।२४।।
यं स्मृत्य दारिद्र्यमहाभिशापरोगादिभिर्न स्पृश्यते शरीरी ।
यमाश्रिताश्चेप्सितमाप्नुवन्ति सोमेश्वरं तं शरणं व्रजामि ।।२५।।
येन त्रयीधर्ममवेक्ष्य पूर्वं ब्रह्मादयस्तत्र समीहिताश्च ।
एवं द्विधा येन कृतं शरीरं सोमेश्वरं तं शरणं व्रजामि ।।२६।।
यस्मै नमो गच्छति मन्त्रपूतं हुतं हविर्या च कृता च पूजा ।
दत्तं हविर्येन सुरा भजन्ते तं सोमनाथं शरणं व्रजामि ।।२७।।
यस्मात्परं नान्यदस्ति प्रशस्तं यस्मात्परं नैव सुसूक्ष्ममन्यत् ।
यस्मात्परं नो महतां महच्च सोमेश्वरं तं शरणं व्रजामि ।।२८।।
यस्याज्ञया विश्वमिदं विचित्रमचिन्त्यरूपं विविधं महच्च ।
एकक्रियं यद्वदनुप्रयाति सोमेश्वरं तं शरणं व्रजामि ।।२९।।
यस्मिन्विभूतिः सकलाधिपत्यं कर्तृत्वदातृत्वमहत्त्वमेव ।
प्रीतिर्यशः सौख्यमनादिधर्मः सोमेश्वरं तं शरणं व्रजामि ।।३०।।
नित्यं शरण्यः सकलस्य पूज्यो नित्यं प्रियो यः शरणागतस्य ।
नित्यं शिवो यः सकलस्य रूपं सोमेश्वरं तं शरणं व्रजामि ।।३१।।
ब्रह्मोवाच ।
ततः प्रसन्नो भगवानाह नारद तं मुनिम् ।
आत्मार्थं च परार्थं च आपस्तम्बोऽब्रवीच्छिवम् ।।३२।।
सर्वान्कामानाप्नुयुस्ते ये स्नात्वा देवमीश्वरम् ।
पश्येयुर्जगतामीशमस्त्वित्याह शिवो मुनिम् ।।३३।।
ततः प्रभृति तत्तीर्थमापस्तम्बमुदाहृतम् ।
अनाद्यविद्यातिमिरव्रातनिर्मूलनक्षमम् ।।३४।।
इति श्रीब्रह्मपुराणगतगौतमीमाहात्म्ये तीर्थमाहात्म्ये दक्षिणकूल-
स्थापस्तम्बसोमेश्वरतीर्थवर्णनं नाम षष्टितमोऽध्यायः ।

* * *



## (७)
# गोदावरी तीरी महर्षी अगस्तीमुनींनी ब्रह्ममानसपुत्रांसाठी केले ज्ञान तथा अद्वय चिंतन

गौतमी माहात्म्याच्या अठ्ठ्याऐंशीव्या अध्यायात ब्रह्मदेवांनी नारदांना, महर्षी अगस्तीमुनींच्या श्रेष्ठतम विभूतिमत्त्वाचे दर्शन घडविले. त्यात प्रामुख्याने अगस्त्यांनी ऋषीउत्पत्ती, प्रजापतित्व, सृष्टीउत्पत्ती, अद्वैत सिद्धांत अर्थात ज्ञानस्वरूप याविषयी सर्व ऋषीमुनींसह सप्तर्षींना ज्ञानप्रबोधित केले आहे. हे चिंतन जेथे घडले तेथील गौतमी तीर्थाला व्यास तीर्थ तसेच प्राचेतस तीर्थ असे नाव मिळाले.

ब्रह्मदेव नारदांना सांगू लागले, ''जगाचे निर्माते असे माझे दहा मानसपुत्र पृथ्वीचा अंत जाणून घेण्याच्या इच्छेने आपल्या अंगच्या सर्व सामर्थ्यानिशी निघाले. पुन्हा काही ऋषी निर्माण झाले, तेही त्यांनाच शोधायला गेले. त्यानंतर वेदवेदांग तत्त्वज्ञ आणि सर्व शास्त्रात प्रवीण असे अंगीरस पुत्र जन्माला आले. अंगीरसांनी अनुमती दिल्यावर अंगीरस पुत्र तप करण्याच्या निश्चयाने निघाले; परंतु ते आईची अनुमती घेण्यास विसरले. संतापाने मातेने मुलांना शाप दिला- 'माझा अनादर करून जी मुले तप करायला निघाली आहेत त्यांना कुठल्याही प्रकारे यश मिळणार नाही' -''

''अंगीरस पुत्रांचे पुढे काय झाले?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''राक्षस, माणसे आणि स्वतःचे प्रमाद व देहदोष यामुळे सतत संकटे येत राहून अनेक देश हिंडून सुद्धा संकटे त्यांचा पाठलाग करीत होती व तपश्चर्या सिद्धीस जाईना.'' ब्रह्मदेव पुढे म्हणाले, ''अशा रीतीने भटकत असताना अंगीरस पुत्र श्रेष्ठ तपोनिधी, जगद्गुरु कुंभद्भव महर्षी अगस्तीमुनींच्या आश्रमात आले. अग्नीवंशात जन्मलेल्या अंगीरस पुत्रांनी गौतमीजवळील आश्रमातील दक्षिण दिशेच्या शांत स्वामींना आपले वृत्त सांगून तपोसिद्धीसाठीचा उपाय विचारला. (श्लोक ११ ते १५) क्षणभर विचार करून अगस्त्य हळूहळू त्यांच्याशी बोलले.''

''महर्षी अगस्त्यांनी त्यांना कोणते गुह्य निवेदित केले?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''महर्षी अगस्त्य त्यांना सांगू लागले- अगस्त्य म्हणाले- 'ब्रह्मदेवाने आपल्याला जन्म दिला आहे. आपण सर्व शांत चित्ताचे आहात; तथापि गर्व हे तुमच्या तपाची सांगता न होण्याचे कारण आहे. ब्रह्मदेवाने सुरुवातीला निर्माण केलेले मानसपुत्र पृथ्वीचा अंत शोधण्यासाठी गेले. त्यानंतर निर्माण झालेलेही त्यांनाच शोधायला गेले. ते सर्व ऊर्ध्वगामी झाले. ते सर्व सुखात आहेत. तुम्ही सर्व अंगीरस पुत्र तेच ज्ञान शोधण्यासाठी निघाले आहात. गर्व सांडून, नम्रपणे तुम्ही हळूहळू ज्ञानसाधना केलीत तर तुम्ही प्रजापतिपेक्षाही श्रेष्ठ व्हाल, यात शंका नाही. त्याकरिता तुम्ही शिवांना प्रिय असलेल्या तपस्विनी गंगेवर तप करावयास जा. तेथे आश्रमाच्या पावन प्रदेशात ज्ञानदाची म्हणजे ज्ञान देणाऱ्याची पूजा करा. ते महान बुद्धीमान तुमच्या सगळ्या शंका दूर करतील. सद्गुरुंशिवाय कोणालाही कधीही यश मिळत नाही' -''

''ते सद्गुरुंकडून कृपावंत झाले का?'' नारदांनी मध्येच विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''त्या अंगीरस पुत्रांना महर्षी अगस्तीमुनींचे म्हणणे समजले नसावे. त्यांनी अगस्तीमुनींना विचारले- 'ज्ञानद कोणाला म्हणतात? ब्रह्मदेवाला, विष्णूला, महेशांना, आदित्यांना की चंद्रांना? किंवा हे मुनिवर, अग्नी की वरुण? कोण आहे ज्ञानद?' -''

ब्रह्मदेव पुढे म्हणाले, ''महर्षी अगस्त्यांनी त्यांना विचारपूर्वक सांगावयास सुरुवात केली. ज्ञानद हा असा असतो, ऐका- 'ज्या जलदेवता आहेत तोच सूर्य आहे; अग्नी आहे; भास्कर आहे आणि तोच विष्णू आहे; तोच ब्रह्मदेव, रुद्र व सर्वकाही आहे. ज्याच्याकडे हे सर्व आहे, तेच ज्ञान आहे. ते देणाऱ्याला इथे ज्ञानद असे म्हणतात. सद्गुरु हाच ज्ञानद असतो. गुरू हे उपदेश करणारे, प्रेरणा देणारे, स्पष्टीकरण किंवा टिका करणारे उपाध्याय किंवा पुरोहित आणि देहद म्हणजे जन्म देणारे असे अनेक प्रकारचे असतात. मात्र सद्गुरु या सगळ्यात महान असतात. ते ज्ञानद असतात म्हणजे ते ज्ञानमय असतात. ज्यामुळे सर्व शंका, भय फिटून जातात, त्यालाच ज्ञान असे म्हणतात. जे निरनिराळ्या कारणाने गोंधळून गेलेले आहेत किंवा भ्रमात अडकलेले आहेत, त्यांना एकत्वाचे म्हणजे अद्वैताचे अर्थात परब्रह्माचे ज्ञान देण्यासाठी सद्गुरु इंद्र, मित्र, अग्नी, रुद्र, सूर्य अशा अनेक नावांनी उदाहरणांसह निर्देश करीत सर्व परमेश्वराचीच रूपे आहेत अर्थात अद्वैत हेच ज्ञान आहे, असे निर्देश करतात' -''

''अंगीरस पुत्रांना मुनींनी अद्वैताचे मर्म सांगितले तेव्हा त्यांच्यात कोणता बदल झाला?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले- ''ते अंगीरस पुत्र अर्थात माझे दशमानसपुत्र अद्वैताचे गान करीत, पाच जण दक्षिण तीरावर आणि पाच जण उत्तर तीरावर गेले. महर्षी अगस्त्यांनी सांगितलेल्या सर्व देवतांची विधिवत पूजा करीत ते आसनांवर बसून तत्त्वचिंतन करीत राहिले. तेव्हा सर्व सुरगण प्रसन्न झाले. सर्व देवांनी या ब्रह्ममानसपुत्रांना सांगितले- विश्वकर्त्याने ज्या सृष्टत्वाची व युगाची कल्पना केली त्यासाठी वेदांच्या स्थापनेकरिता, लोकांवर उपकार करण्यासाठी व अधर्म निवारणासाठी तसेच पुराणे, स्मृति, वेदार्थ, धर्म आणि शास्त्र यांचा अर्थ निश्चित करण्यासाठी, सृष्टत्व करण्यासाठी तुम्ही सिद्ध व्हाल. हे ब्रह्ममानस पुत्रांनो, तुम्हास प्रजापतित्व प्राप्त होईल. जेव्हा जेव्हा वेदादि संकटात सापडतील, धर्माला ग्लानी येईल त्या त्यावेळी गंगेच्या तीरावरील ही तपोभूमी अर्थात अगस्त्यमुनी क्षेत्र उत्तम स्थान होईल. या भूमीत शिष्य, विष्णू, मी (ब्रह्म), आदित्य, अग्नी, जलदेवता यांचे सान्निध्य नेहमी असेल; जणू केवळ परब्रह्मच येथे वास करील. सर्वात्मक, व्यापक सर्व देवांनी वेढलेला असा अनुग्रह करणारा शिव, सर्व प्राण्यांवर दया करण्यासाठी त्या तीर्थावर विशेषत्वाने असेल. सर्व देवांनी सांगितले ते शिवस्वरूप अर्थात

महर्षी अगस्त्य धर्मव्यास किंवा वेदव्यास आहेत असे समजा.'' ब्रह्मदेवांनी नारदांना महर्षी अगस्त्यांच्या कृपेने, ब्रह्ममानसपुत्रांना अद्वैत ज्ञान कसे प्राप्त झाले हे सांगून या तीर्थाला व्यासतीर्थ किंवा सिद्धीतीर्थ म्हणतात असे घोषित केले.

अशा रीतीने श्रीब्रह्मपुराणातल्या गौतमी माहात्म्यातल्या तीर्थमाहात्म्या मधला व्यासतीर्थवर्णनम् नावाचा अठ्ठ्याऐंशीवा अध्याय संपला.

* * *



# अथ अष्टाशीतितमोऽध्यायः ।

ब्रह्मोवाच ।
व्यासतीर्थमिति ख्यातं प्राचेतसमतः परम् ।
नातः परतरं किंचित्पावनं सर्वसिद्धिदम् ।।१।।
दश मे मानसाः पुत्राः स्रष्टारो जगतामपि ।
अन्तं जिज्ञासवस्ते वै पृथिव्या जग्मुरोजसा ।।२।।
पुनः सृष्टाः पुनस्तेऽपि यातास्तान्समवेक्षितुम् ।
नैव तेऽपि समायाता ये गतास्ते गता गताः ।।३।।
तदोत्पन्ना महाप्राज्ञा दिव्या आङ्गिरसो मुने ।
वेदवेदाङ्गतत्त्वज्ञाः सर्वशास्त्रविशारदाः ।।४।।
तेऽनुज्ञाता अङ्गिरसा गुरुं नत्वा तपोधनाः ।
तपसे निश्चिताः सर्वे नैव पृष्ट्वा तु मातरम् ।।५।।
सर्वेभ्यो ह्यधिका माता गुरुभ्यो गौरवेण हि ।
तदा नारद कोपेन सा शशाप निजात्मजान् ।।६।।
मातोवाच ।
मामनादृत्य ये पुत्राः प्रवृत्ताश्चरितुं तपः ।
सर्वैरपि प्रकारैस्ते सिद्धिं नेष्यन्ति तत्त्वतः ।।७।।
ब्रह्मोवाच ।
नानादेशांश्च चिन्वानास्तपः सिद्धिं न यान्ति च ।
विघ्नमन्वेति तान्सर्वानितश्चेतश्च धावतः ।।८।।
क्वापि तद्राक्षसैर्विघ्नं क्वापि तन्मानुषैरभूत् ।
प्रमदाभिः क्वचिच्चापि क्वापि तद्देहदोषतः ।।९।।
एवं तु भ्रममाणास्ते ययुः सर्वे तपोनिधिम् ।
अगस्त्यं तपतां श्रेष्ठं कुम्भयोनिं जगद्गुरुम् ।।१०।।
नमस्कृत्वा ह्याङ्गिरसा ह्यग्निवंशसमुद्भवाः ।
दक्षिणाशापतिं शान्तं विनीताः प्रष्टुमुद्यताः ।।११।।

आङ्गिरसा ऊचुः ।
भगवन्केन दोषेण तपोऽस्माकं न सिध्यति ।
नानाविधैरप्युपायैः कुर्वतां च पुनः पुनः ।।१२।।
किं कुर्मः कः प्रकारोऽत्र तपस्येव भवाम किम् ।
उपायं ब्रूहि विप्रेन्द्र ज्येष्ठोऽसि तपसा ध्रुवम् ।।१३।।
ज्ञातासि ज्ञानिनां ब्रह्मन्वक्तासि वदतां वरः ।
शान्तोऽसि यमिनां नित्यं दयावान्प्रियकृत्तथा ।।१४।।
अक्रोधनश्च न द्वेष्टा तस्माद्ब्रूहि विवक्षितम् ।
साहंकारा दयाहीना गुरुसेवाविवर्जिताः ।
असत्यवादिनः क्रूरा न ते तत्त्वं विजानते ।।१५।
ब्रह्मोवाच ।
अगस्त्यः प्राह तान्सर्वान्क्षणं ध्यात्वा शनैः शनैः ।।१६।।
अगस्त्य उवाच ।
शान्तात्मानो भवन्तो वै स्रष्टारो ब्रह्मणा कृताः ।
न पर्याप्तं तपश्चाभूत्स्मरध्वं स्मयकारणम् ।।१७।।
ब्रह्मणा निर्मिताः पूर्वं ये गताः सुखमेधते ।
ये गताः पुनरन्वेष्टुं ते च त्वाङ्गिरसोऽभवन् ।।१८।।
ते यूयं च पुनः काले याता याताः शनैः शनैः ।
प्रजापतेरप्यधिका भवितारो न संशयः ।।१९।।
इतो यान्तु तपस्तप्तुं गङ्गां त्रैलोक्यपावनीम् ।
नोपायोऽन्योऽस्ति संसारे विना गङ्गां शिवप्रियाम् ।।२०।।
तत्राश्रमे पुण्यदेशे ज्ञानदं पूजयिष्यथ ।
स च्छेदयिष्यत्यखिलं संशयं वो महामतिः ।
न सिद्धिः क्वापि केषांचिद्विना सद्गुरुणा यतः ।।२१।।
ब्रह्मोवाच ।
ते तमूचुर्मुनिवरं ज्ञानदः कोऽभिधीयते ।
ब्रह्मा विष्णुर्महेशो वा आदित्यो वापि चन्द्रमाः ।।२२।।
अग्निश्च वरुणः कः स्याज्ज्ञानदो मुनिसत्तम ।
अगस्त्यः पुनरप्याह ज्ञानदः श्रूयतामयम् ।।२३।।



या आपः सोऽग्निरित्युक्तो योऽग्निः सूर्यः स उच्यते ।
यश्च सूर्यः स वै विष्णुर्यश्च विष्णुः स भास्करः ।।२४।।
यश्च ब्रह्मा स वै रुद्रो यो रुद्रः सर्वमेव तत् ।
यस्य सर्वं तु तज्ज्ञानं ज्ञानदः सोऽत्र कीर्त्यते ।।२५।।
देशिकप्रेरकव्याख्याकृदुपाध्यायदेहदाः ।
गुरवः सन्ति बहवस्तेषां ज्ञानप्रदो महान् ।।२६।।
तदेव ज्ञानमत्रोक्तं येन भेदो विहन्यते ।
एक एवाद्वयः शंभुरिन्द्रमित्राग्निनामभिः ।
वदन्ति बहुधा विप्रा भ्रान्तोपकृतिहेतवे ।।२७।।
ब्रह्मोवाच ।
एतच्छ्रुत्वा मुनेर्वाक्यं गाथा गायन्त एव ते ।
जग्मुः पञ्चोत्तरां गङ्गां पञ्च जग्मुश्च दक्षिणाम् ।।२८।।
अगस्त्येनोदितान्देवान् पूजयन्तो यथाविधि ।
आसनेषु विशेषेण ह्यासीनास्तत्त्वचिन्तकाः ।।२९।।
तेषां सर्वे सुरगणाः प्रीतिमन्तऽभवत्सुरे ।।
सत्त्वं तु युगादौ यत्कल्पितं विश्वयोगिना ।।३०।।
अधर्माणां निवृत्त्यर्थं वेदानां स्थापनाय च ।।
लोकानामुपकारार्थं धर्मकामार्थसिद्धये ।।३१।।
पुराणस्कृतिवेदार्थधर्मशास्त्रार्थाक्षिणे ।
सत्त्वं जगतामिष्टं तादृयूपा भविष्यथ ।।३२।।
प्रजापतित्वं तेषां वै भविष्यति शनैः क्रमात् ।।
यदा हाधनों भविता वेदानां च पराभवः ।।३३।।
वेदानां व्यसनं तेभ्यो भाविव्यासास्ततस्तु ते ।
यदा तु धर्मस्य ग्लानिर्वेदस्य दृश्यते ।।३४।।
तदा तदा तु ते व्यासा भविष्यन्त्युपकारिणः ।।
तेषां यत्तपसः स्थानं गङ्गायास्तीरमुत्तमम् ।।३५।।
तत्र तत्र शिवो विष्णुरहमादित्य एव च ।
अभिरामः सर्वमिति तत्र सनिहितं सदा ।।३६।।

नैतेभ्यः पावनं किंचितैतेभ्यस्त्वाधिकं कचित् ।
तत्तदाकारतां प्राप्तं परं ब्रह्मैव केवलम् ।।३७।।
सर्वात्मकः शिवो व्यापी सर्वभावस्वरूपधृक ।
विशेषतस्तत्र तीर्थे सर्वप्राण्यनुकम्पया ।।३८।।
सर्वदेवैरनुवृतस्तदनुग्रहकारकः ।।
धर्मव्यासास्तु ते ज्ञेया वेदव्यासास्तथैव च ।।३९।।
तेषां तीर्थं तेन नाम्ना व्यपदिष्टं जगत्रये ।
पापपक्षालनाम्भो मोहध्वान्तमदापहम् ।
सर्वसिद्धिप्रदं पुंसां व्यासतीर्थमनुत्तमम् ।।५७।।
इति श्रीब्रह्मपुराणगतगौतमीमाहात्म्ये तीर्थमाहात्म्ये
व्यासतीर्थवर्णनं नाम अष्टाशीतितमोऽध्यायः ।

* * *



## (८)

# सागराकडून महर्षी अगस्त्यांचा गौरव अर्थात गंगासागर संगम कथा

ब्रह्मपुराणातील एकशेदोनव्या अध्यायात गोदावरी समुद्रगमन अर्थात सामुद्रतीर्थमाहात्म्य ब्रह्मदेवांनी नारदांना कथन केले आहे.

ब्रह्मदेव नारदांना म्हणाले, ''सर्व तीर्थांचे फळ देणारे सामुद्रतीर्थ गौतमीच्या सप्तधारांरूपात सागरप्रवेशाने सिद्ध झाले आहे. हे नारदा, महर्षी गौतमांनी ही गंगा पूर्व समुद्राकडे वाहती केली. तत्पूर्वी देव नदी अवतीर्ण होताना मी ती कमंडलूत घेतली आणि परमात्मा शंकराने ती डोक्यावर धारण केली. विष्णूंच्या पायापासून सुरू झालेल्या या गंगेचा प्रवाह महात्मा गौतमांनी मर्त्य लोकात आणला.''

''हे पिताश्री, गंगेचा सागरात प्रवेश कसा झाला, ते मला सांगावे.'' नारद म्हणाले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''हा प्रवाह सागराच्या दृष्टीने सर्वोत्तम गुरू एवढा श्रेष्ठ आहे असे पाहून सरितापती रत्नाकर सागर श्री गंगेला सामोरा जाऊन म्हणाला– त्रैलोक्यात वाहणारा हा प्रवाह माझ्यातच समाविष्ट व्हावा कारण मी रत्ने, अमृत, पर्वत, राक्षस, सुर ह्यांच्या बरोबरच अनेक प्रचंड गोष्टी धारण करतो. श्री विष्णूही माझ्याच ठायी निद्रा करतात. माझ्यातील समावेशनाने तुझा गौरवच होईल.''

''गंगेने सागराचे म्हणणे मान्य केले?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''आपली प्रौढी सांगणाऱ्या सागराला गंगा म्हणाली–

'मी सांगते तसे करशील तरच मी तुझ्यात संगमित होऊ शकेन. तुझ्यातील एक उणीव तू नाहिशी कर.' त्यावर सागर म्हणाला– 'एक भगवान महर्षी अगस्त्यांनी केलेला पराभव सोडला तर माझ्यात कोणतेच न्यून नाही' –''

''मग गंगेने कोणता उपाय सुचविला?'' नारदांनी विचारले.

ब्रह्मदेव म्हणाले, ''गंगेने सागराला अट घातली. ती म्हणाली– 'तू सप्त ऋषींच्या पत्नींसह येथे आणून त्यांचा गौरव केला तरच मी नम्रतेने तुझ्याशी संगम करेन कारण माझे जीवन महर्षी गौतम, भगवान अगस्त्य अशा ब्रह्ममानसपुत्रांना म्हणजे ऋषीकार्याला समर्पित आहे.' सागराला गंगेचे म्हणणे मान्य करावे लागले. सागराने प्रार्थनापूर्वक महर्षी अगस्त्यांसह सप्तर्षींना आवाहन केले व त्यांना गंगासागर संगमाची अनुमती देण्याची विनंती केली.'' (श्लोक क्र. ११ ते १८)

ब्रह्मदेव पुढे म्हणाले, ''सप्तर्षींच्या उपस्थितीत, सप्तर्षींच्या नावांप्रमाणे गौतमी गंगा सप्त प्रवाहात विभागली व सप्त गंगा होऊन सागराशी संगमित झाली. महर्षी अगस्त्यांच्या समुद्रप्राशन या सागर गर्वहरण प्रसंगाचे स्मरण करून देणारे हे तीर्थ सर्व पापांचा नाश करणारे, आनंद देणारे त्रैलोक्यात समुद्रापेक्षा श्रेष्ठ तीर्थ आहे. (श्लोक क्र. १९, २०)

अशा रीतीने श्रीब्रह्मपुराणातल्या गौतमी माहात्म्यातल्या तीर्थमाहात्म्या मधला सप्तधा गोदावरीसमुद्रगमनवर्णनम् नावाचा एकशेदोनावा अध्याय संपला.

* * *



# अथ द्व्यधिकशततमोऽध्यायः ।

ब्रह्मोवाच ।
सामुद्रं तीर्थमाख्यातं सर्वतीर्थफलप्रदम् ।
तस्य स्वरूपं वक्ष्यामि शृणु नारद तन्मनाः ।। १।।
विसृष्टा गौतमेनासौ गङ्गा पापप्रणाशिनी ।
लोकानामुपकारार्थं प्रायात्पूर्वार्णवं प्रति ।।२।।
आगच्छन्ती देवनदी कमण्डलुधृता मया ।
शिरसा च धृता देवी शंभुना परमात्मना ।।३।।
विष्णुपादप्रसूतां तां ब्राह्मणेन महात्मना ।
आनीतां मर्त्यभवनं स्मरणादघनाशिनीम् ।।४।।
गुरोर्गुरुतमां सिन्धुर्दृष्ट्वा कृत्यमचिन्तयत् ।
या वन्द्या जगतामीशा ब्रह्मेशाद्यैर्नमस्कृता ।।५।।
तामहं प्रतिगच्छेयं नो चेत्स्याद्धर्मदूषणम् ।
आगच्छन्तं महात्मानं यो मोहान्नोपतिष्ठते ।।६।।
न तस्य कोपि त्रातास्ति पापिनो लोकयोर्द्वयोः ।
एवं विमृश्य रत्नेशो मूर्तिमान्विनयान्वितः
कृताञ्जलिपुटो गङ्गामाहेदं सरितांपतिः ।।७।।
सिन्धुरुवाच ।
रसातलगतं वारि पृथिव्यां यन्नभस्तले ।
तन्मामेवात्र विशतु नाहं वक्ष्यामि किंचन ।।८।।
मयि रत्नानि पीयूषं पर्वता राक्षसाः सुराः ।
एतानप्यखिलानन्यान् भीमान् संधारयाम्यहम् ।।९।।
ममान्तः कमलायुक्तो विष्णुः स्वपिति नित्यदा ।
ममाशक्यं न किमपि विद्यते सचराचरे ।।१०।।
महत्यभ्यागते कुर्यात्प्रत्युत्थानं न यो मदात् ।
स धर्मादिपरिभ्रष्टो निरयं तु समाप्नुयात् ।।११।।

नैतान्मे बिभ्रतः खेदो विनागस्त्यपराभवात् ।
किं तु त्वं गौरवेणैषामतिरिक्ता ततस्त्वहम् ।।१२।।
ब्रवीमि देवि गङ्गे वा त्वं साम्यात्संगता भव ।
नैकरूपामहं शक्तः संगन्तुं बहुधा यदि ।।१३।।
सङ्गमेष्यसि देवि त्वं संगच्छेऽहं न चान्यथा ।
गङ्गे समेष्यसि यदि बहुधा तद्विचारये ।।१४।।
ब्रह्मोवाच ।
तमेवंवादिनं सिन्धुमपामीशं तदाब्रवीत् ।
गङ्गा सा गौतमी देवी कुरु चैतद्वचो मम ।।१५।।
सप्तर्षीणां च या भार्या अरुन्धतिपुरोगमाः ।
भर्तृभिः सहिताः सर्वा आनय त्वं तदा त्वहम् ।।१६।।
अल्पभूता भविष्यामि ततः स्यां तव संगता ।
सप्तर्षीणां तथेत्युक्त्वा भार्याभिर्ऋषिभिर्वृतः ।। १७ ।।
आनयामास तां देवीं सप्तधा सा व्यभज्यत ।
सा चेयं गौतमी गङ्गा सप्तधा सागरं गता ।।१८।।
सप्तर्षीणां तु नाम्नैता सप्त गङ्गास्ततोऽभवन् ।
तत्र स्नानं च दानं च श्रवणं पठनं तथा ।।१९।।
स्मरणं चापि यद्भक्त्या सर्वकामप्रदं शुभम् ।
नास्मादन्यत्परं तीर्थं समुद्राद्भुवनत्रये ।
पापहानौ भुक्तिमुक्तिप्राप्तौ च मनसो मुदे ।।२०।।
इति श्रीब्रह्मपुराणगतगौतमीमाहात्म्ये तीर्थमाहात्म्ये सप्तधा
गोदावरीसमुद्रागमनवर्णनं नाम द्व्यधिकशततमोऽध्यायः ।

* * *